RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)     कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर  वर्ष ३४ वे  अंक १४८ वा  शुक्रवार, दिनांक २९ ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक)  पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26  पृष्ठे – ६  मो:९४२२४७२५०२  किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८


# जरांगे यांचे आझाद मैदानात उपोषण सुरु

## आरक्षण घेणार अन् मुंबई सोडणार





**मुंबई/प्रतिनिधी :** मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी हजारो मराठ्यांसह मुंबईत पोहोचलेत. त्यांनी येथील आझाद मैदानावरील आपल्या बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे. याठिकाणी खबरदारी म्हणून हजारो पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. या आंदोलनामुळे मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेचे तीन – तेरा वाजलेत. त्यामुळे पोलिसांनी नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, मनोज जरांगे व त्यांच्या समर्थकांच्या आंदोलनामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवरील दबाव कैकपटीने वाढला आहे.

सत्ताधारी राष्ट्रवादीचे आमदार विजयसिंह पंडित हे सुद्धा मराठा आंदोलनात सहभागी झालेत. त्यांनी मनोज जरांगेंची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले, मी मनोज जरांगे व सरकारचा दुवा म्हणून येथे आलो आहे. मी सरकारचा प्रतिनिधी म्हणून इथे आलोय. सरकारचे शिष्टमंडळ आजच येथे येऊन जरांगेंची भेट घेई. मी स्वतः सरकारशी संवाद साधेन. माझा या आंदोलनाला पाठिंबा आहे. कारण, हे आदोलन गरजू मराठ्यांसाठी आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारही याविषयी सकारात्मक आहेत. ते उपमुख्यमंत्री म्हणून आपली भूमिका मांडतील.

विजयसिह पंडित यांनी यावेळी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्यावरही निशाणा साधला. आधीच वातावरण खूप दूषित झाले आहे. त्यामुळे लक्ष्मण हाके यांचे नाव घेऊन ते आणखी बिघडवू नका. ते काय म्हणतात त्याकडे मी लक्ष देत नाही, असे ते म्हणाले.

**ठाकरे, पवार गटाचे खासदार आझाद मैदानावर**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे परभणीचे खासदार संजय जाधव यांनी आझाद मैदानावर जाऊन मनोज जरांगेंची भेट घेतली. यावेळी त्यांनी जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबाही दिला.

**फडणवीसांनी मराठा समाजाला १४% आरक्षण दिले: पण उद्धव ठाकरेंच्या नाकर्तेपणामुळे ते गेले**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात (२०१४-२०१९) मराठा समाजाला १४% आरक्षण देण्यात आले होते. परंतु महाविकास आघाडीच्या काळात उद्धव ठाकरे सरकारच्या नाकर्ते पणामुळे ते आरक्षण टिकले नाही. योग्य वकील कोर्टात उभे केले गेले नाहीत, त्यामुळे आरक्षणाची बाजू टिकवता आली नाही. त्याची जबाबदारी संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांच्यावरच आहे. पण महायुतीचं सरकार पुन्हा आल्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्यात आले, अशा शब्दांत भाजपचे प्रदेश माध्यमप्रमुख नवनाथ बन यांनी मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर संजय राऊत यांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.



लातूर अंबाजोगाई रोडवरील महापूर शेजारून वाहणाऱ्या मांजरा नदीचा विवेक तेरकर यांनी ड्रोनच्या साह्याने टिपलेले छायाचित्र

# मांजरा प्रकल्पातील वाढत्या विसर्गामुळे लातूर जिल्ह्यात सतर्कतेचा इशारा

**लातूर/प्रतिनिधी :** मांजरा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्याने गेल्या काही दिवसांपासून प्रकल्पातून मांजरा नदीत वेळोवेळी पाण्याचा विसर्ग सुरू आहे. २८ आणि २९ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे नदीपात्रात सध्या १५ हजार ७२४ क्युसेक्स इतका विसर्ग सुरू असून, यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मांजरा आणि तिच्या उपनद्यांच्या काठावरील गावांतील नागरिक, शेतकरी आणि नदीकाठच्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या सर्वांना सतर्क राहण्याचे आणि विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केले आहे.

नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे, आपली मालमत्ता आणि जनावरे यांची काळजी घ्यावी, तसेच पाण्याच्या वेढ्यात अडकणार नाही याची खबरदारी घ्यावी. दुभती आणि इतर जनावरे झाडाखाली, पाण्याच्या स्रोताजवळ किंवा विद्युत खांबाजवळ बांधू नयेत, त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवावे. जलसाठ्याजवळ किंवा नदीकाठी जाण्याचे टाळावे. मुलांना पोहण्यासाठी पाठवू नये. शाळा आणि महाविद्यालयातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना याबाबत जागरूक करावे.

पुलावरून किंवा नाल्यावरून पाणी वाहत असताना कोणीही पूल किंवा नाला ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. पूरप्रवण क्षेत्रात जाणे टाळावे. पावसादरम्यान विजेच्या तारा, जुन्या इमारती कोसळण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यापासून दूर राहावे, असे आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत करण्यात आले आहे.



# हसरणी गावातील ३० घरांमध्ये पाणी: नागरिकांना सतर्क राहण्याचे प्रशासनाचे आवाहन

**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर तालुक्यात २७ ऑगस्ट रोजी रात्रीपासून जोरदार पाऊस होत असून आणखीन एक पाऊस चालूच आहे. त्यामुळे पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून तालुक्यातील हसरणे गावातील ३० घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे त्या ठिकाणच्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. तर टेंभुर्णी येथील ३ घरांमध्येही पाणी शिरले आहे. अहमदपूर शहराजवळ असलेल्या डांगे तलावाचा कालवा फुटला असून यामुळे शेतीचे व पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्यातील अनेक मोठे व मध्यम साठवण तलाव आणि लघु प्रकल्प पूर्ण भरले आहेत. आजच्या पावसामुळे उर्वरित प्रकल्पांमध्येही पाणीसाठा मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. या पावसामुळे पिकांचे नुकसान झाले.



# निसर्ग जतन करण्यास वृक्ष संवर्धन करा, सजावटीत वापरले जाणारे प्लास्टिक टाळावे

## पानांच्या गणपती मधून माझं घर येथे पर्यावरणाचा संदेश

**लातूर/प्रतिनिधी :** माझं घर येथे पहिल्यांदा विविध वृक्षांच्या पानापासून तयार केलेला गणपती बसवण्यात आला. यामध्ये माझं घर, सह्याद्री देवराई, लातूर वृक्ष चळवळ या सगळ्यांनी सहभाग घेतला होता. गणेश तयार करण्यासाठी वड, पिंपळ बकुळ, कदंब, कोरफड याची पाने वापरली गेली आहेत. सार्वजनिक पद्धतीने जिल्ह्यामध्ये अशा प्रकारचा बसवण्यात आलेला हा पहिलाच गणपती आहे. यामधून आपण पर्यावरण पूरक संदेश देण्यात येत आहे.



निसर्ग जतन करा, विविध वनस्पती, देवराई जतन करा,वृक्ष संवर्धन करा, झाडे असतील तर त्यामुळे मातीमध्ये पाणी टिकेल. यासोबत प्लास्टिक कॅरीबॅग टाळा, सजावटीमध्ये वापरले जाणारे प्लास्टिक मटेरियल टाळावे. हा संदेश या पर्यावरणपूरक गणेश स्थापनेतून देण्यात आला आहे. ही झाडांची पाने हे या ब्रह्मांडातून विविध प्रकारच्या औषधी गुणधर्म हवेतून शोषण करतात आणि वाळवल्यानंतर त्यांचा पालापाचोळा कुजून तो देखील खत म्हणून माती सुपीक करण्यासाठी मदत करतो. म्हणजे वृक्ष प्राणवायू देतोच सोबत पान, फळ, बियां या सगळ्या गोष्टीमुळे मानवाचे इतर जीवांचे अस्तित्व आहे. हा संदेश या मधून देण्यात आला.

या संकल्पना सह्याद्री देवराईचे सुपर्ण जगताप यांनी मांडली आणि त्यांच्या कल्पनेतून हा गणेश साकार झाला. गणेश स्थापना माझं घर या प्रकल्पावर करण्यात आली. यावेळी शरद झरे, संगीता झरे, प्रणव भुसनुरे, बसवराज मुस्तापुरे, माऊली गंभीरे, आदी उपस्थित होते.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



इंजिनियरिंगच्या लाखो जागा, पण प्रवेश निम्म्याहून कमी...




जोरदार पावसाने हाताची आलेली खरीप पिके गेली ! घरात, रानात पाणीच पाणी !! आता गरज शेतकऱ्यांना मदतीची !!

# प्रियकराच्या मदतीने पतीचा केला खून: पाच जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा

## पत्नी, प्रियकर अटकेत, ऑटोचालकसह अन्य दोघे फरार

**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर शहरातील पारकट्टी गल्ली भागात राहाणाऱ्या पत्नीने प्रेमप्रकरणातून पतीचा प्रियकर व त्याच्या तीन मित्रांच्या मदतीने खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी गुरुवारी (२८ ऑगस्ट) उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात पत्नी, प्रियकर आणि प्रियकराचे तीन मित्रा विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्नी, प्रियकराला पोलिसांनी अटक केली असून ऑटोचालकसह अन्य दोघे फरार आहेत. हनुमंत शरनअप्पा जनवाडे (वय ४० वर्षे रा. पारकट्टी गल्ली उदगीर) असे खुन झालेल्या पतीचे नाव आहे.




२७ ऑगस्ट रोजी सायंकाळी चार ते साडेसहाच्या दरम्यान फिर्यादीचा मयत भाऊ हनुमंत शरनअप्पा जनवाडे (वय ४० वर्षे, रा.पारकट्टी गल्ली उदगीर) यास त्याची पत्नी पुजा हानुमंत जनवाडे व तिचा मित्र सुनिल उर्फ पिंटु पाटील यांनेउदगीर शहरालगत असलेल्या इच्छापुर्ती हनुमान मंदिराचे जवळ जबरदस्तीने ॲटोमध्ये घेवुन जावुन मयत हाणमंत याचे डोक्यात, पाटीवर हातावर, पायावर, पिंडरीवर जबर दुखापत करून त्याचा खून केला आहे, अशी फिर्याद मयताचा भाऊ विनोद धनराज जनवाडे (वय २४, रा. एस टी कॉलनी मुळे नगर उदगीर ता. उदगीर, ह.मु. निटुरबी ता. भालकी जि. बिदर कर्नाटक) यांनी दिल्यावरून उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात पूजा हणमंत जनवाडे (वय ३५ रा.पारकट्टी गल्ली उदगीर), सुनिल उर्फ पिंटु पाटील (रा जानापुर ता. उदगीर) सोबत दुसरे तीन अनोळखी पुरुष आरोपी यांच्या विरोधात खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक देवकर हे करीत आहेत.

**पुर्वनियोजित घटना, मुलांच्या माहितीवरून फुटले बिंग** पत्नीने व प्रियकरांनी कट रचून माहेर (जानापूर ता.उदगीर) येथील डोळ्याच्या दवाखान्यात दाखवून येऊ म्हणून घरातून ऑटोने घेऊन गेले व उदगीर शहरातील नांदेड रोडवरील मोरे आय हॉस्पिटल जवळ पत्नी ऑटोततून उतरली अन् प्रियकराने मोकळ्या जागेत घेऊन जाऊन मित्रांच्या मदतीने काठीने बेदम मारहाण केली. त्यानंतर ठरल्याप्रमाणे पत्नीने घटनास्थळी येऊन पतीला रुग्णालयात दाखल केले. ग्रामीण पोलिसांनी रात्रभर तपास गतीमान केला व मयताच्या सहावीत शिकणाऱ्या मुलाने व चौथीत शिकणाऱ्या मुलीच्या माहितीवरून खुनाचे बिंग फुटले.

**–राजकुमार पुजारी,**
**पोलीस निरीक्षक,**
**उदगीर ग्रामीण पोलिस ठाणे**

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## गणपतीनिमित्त ठाकरे बंधु एकत्र भेट

महाराष्ट्रात ठाकरे परिवाराचे वर्चस्व आज ही कायम आहे. हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची आठवण महाराष्ट्र कदापी विसरणार नाही. एवढे जादू त्यांच्याकडे होती. अनादीकाळापर्यंत हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव स्मरणात राहणार आहे. यामागे तसा विचार केला तर कदापी किंग राजा बनले नाहीत. कोणतेही राजकियपद मिळविले नाही. त्यांना पंतप्रधान व राष्ट्रपतीपद सहज होता आले असते. मुख्यमंत्रीतर पद सोडा ते तर त्यांच्यासाठी छुल्लक बाब होती. देशात पंतप्रधान किंवा राष्ट्रपती बनविण्यासाठी हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा सल्ला घेत होते. राज्यात काय देशात कोणतीही बाब त्यांना विसरल्याशिवाय निर्णय होत नव्हता ही वस्तूस्थिती अनेकांनी अनुभवली आहे. तसे किंग्जमेकर बनले पाहिजे. आपणच राजा होऊन आपली किंमत कमी करणे योग्य नसते, हे अनुभवाने येत असते. त्यामुळे चुका होत असतात. वास्तविक उद्धवजींनी मुख्यमंत्रीपद स्विकाराला नको होते. राजा बनविणारा राजा होत नसतो ही साधी बाब, त्यांच्या लक्षात आली नाही. आपल्या वडीलाकडील असलेले गुण व धर्म याचा विचार केला नाही म्हणून ही चुक दिसून येते. त्यांनी मुख्यमंत्रीपद स्विकारल्यानंतर राज्यात शिवसेनेची स्थिती काय झाली. काँग्रेस किंवा शरद पवार यांच्या पक्षाचे काही नुकसान झाले नाही. काँग्रेस देशपातळीवरचा पक्ष आहे तर शरद पवार जेष्ठ नेते आहेत. त्यांना आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी चांगले मानतात व जाणतातही! त्यामुळे या दोघांचे नुकसान झाले नाही तर खरे नुकसान शिवसेनेचे झाले आहे. ही बाब अजूनही कोणाच्या लक्षात येत नाही. आजही एकनाथ शिंदे यांचा मुख्यमंत्रीवेळीचा काळ आठवतात. आनंदाचा शिधा कदापी गोरगरीब जनसामान्य जनता विसरणार नाही. त्यामुळे काम करावे एकनाथ शिंदे यांच्यासारखे असे जनता आजही म्हणत आहे. त्यांना कोणत्याही परिस्थितीत बाजूला जाऊ न देणे गरजेचे होते. शिवसेना फुटू न देणे उद्धवजींच्या आगामी काळासाठी महत्वाचे होते. त्यांचे पुत्र आहेत मात्र अजून त्यांना चांगल्या अनुभवाची गरज आहे. पेहलवान कधी तयार होतो त्याला अनेक डावपेच शिकल्यानंतर. तसे चिरंजीवाचे नाही. एकतर मुंबई ही मराठी माणसाची होती. यात बिहारी, युपी व गुजरातीची संख्या वाढली. तरीही मराठी माणूस शिवसेनेकडे आकर्षिला जात आहे. तेवढे तरी शिवसैनिकांनी टिकून ठेवले आहे. त्यामुळे ज्या चुका झाल्या त्या भरून काढणे अशक्य आहे तरी प्रयत्न केला पाहीजेत. त्यामुळे सध्याला राज व उद्धव ठाकरे एकत्र येणार अशी चर्चा चालू होती याला यश ही आले. दोघे बंधू एकत्र आले. वास्तविक परिवारातील ही बाब आहे. तसे पाहिले तर राज ठाकरे यांना पक्षातून बाहेर काढणे किंवा ते जाणे नुकसानीचे होते. तेच झाले. ज्यावेळी उद्धव ठाकरे यांना कार्याध्यक्ष बनविले त्याच वेळी जी चुक झाली ती आजूनही भरून येणे आवघड आहे. बाळासाहेब ठाकरे नंतर उद्धवजींनी असे कोणते पक्षासाठी कामे केले? उलट त्यांनी काँग्रेसची सोबत गेले हेच अनेक निष्ठावंत शिवसैनिकांना खटकले होते. काही का असत नाही. शेवटी दोघे बंधु एकत्र आले हे महत्वाचे मराठी माणसा साठी योग्य आहे. तसा विचार केला तर आज राज्यात किंवा देशात स्थिती काय सांगते याचाही विचार केला पाहिजे. देशात कोणाचे वारे आहे. आज देशात घडामोडी घडत आहेत. त्या भाजपासाठी योग्य आहेत. पंतप्रधान हे आजही अमेरिकेसमोर झुकले नाही हा केवढा स्वाभिमान म्हणावा. दुसरा कोणता देश किंवा व्यक्ती असता तर काय झाले असते? अमेरिका हा महासत्ताधिश आहे. तो काहीही कारू शकतो एवढी क्षमता आहे. तरी भारत नरमला नाही. त्यामुळे मोदी म्हणजे काही प्रमाणात भाजपाकडे जनता झुकली जात आहे. आजूनही विरोधीपक्षात बालीशपना आहे तो कमी होत नाही. नको ते वक्तव्य करून हासू करून घेत आहेत. मोदी यांना काही दिवसात दंडे मारतील असे वक्तव्य करणे म्हणजे आपलीच किंमत कमी करून घेण्यासारखे आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे विचार करून बोलले पाहिजे. आकरावर्षात विरोधकांनी काय साध्य केले. उलट दिल्ली आपने मिळविली होती ती हातून गेली. पंजाब आपकडे आहे. तसे राष्ट्रीयपक्ष म्हणून काँग्रेसची क्षमता वाढली पाहिजे. त्याच प्रमाणे आज राज्यात काय स्थिती आहे. याचा विचार केला तर शिवसेनची ताकद वाढविण्यासाठी मोठी कसरत करावी लागेल. आज जरी दोन बंधु एकत्र आले तरी जे निष्ठावंत बाजूला गेले व सत्तेत आहेत त्यांना कसे वळविणार? आज पुणे-मुंबईत शिवसेनेचे वर्चस्व आहे, ग्रामीण स्तरावर मोठे काम करावे लागणार आहे. तरच ताकद वाढणार आहे. त्यापेक्षा दोन भाऊ एकत्र आले म्हणजे आज राजकिय परिस्थिती बदलेल असे दिसून येत नाही. मनसेची स्थिती काय आहे याचाही विचार केला पाहिजे. एकतर शिवसेना उद्धव ठाकरे यांची स्थिती समाधान कारक नाही हे कोठेतरी मान्यच केले पाहिजे. त्याच प्रमाणे राज ठाकरे यांची मनसेचे काय होणार? हा मोठा प्रश्न राज्यातील जनतेला सतावत आहे. या बाबत कोणी काही बोलत नाही. त्याचे स्पष्टीकरण होणे अपेक्षित आहे. त्यामुळे आज राज्यात दोघे भाऊ एकत्र येणार अशी चर्चा होताना एकत्रीत कार्यक्रमाची मोठी गरज आहे. काही बाबीचा खुलासा महत्वाचा आहे. केवळ एकत्र येणार आले, पुढे काय? त्यामुळे आगामी कार्याची रूपरेषा महत्वाची आहे. या बाबत बाळ नांदगांवकर यांनी पुढाकार घेतला पाहिजे. आज भाजपामध्ये राज ठाकरे यांचे वजन आहे ते कोणत्याही परिस्थितीत समाप्त होवू न देणे महत्वाचे आहे. राज ठाकरे यांचे संबंध भाजपातील बड्या नेत्याशी चांगले आहेत. ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. त्यामुळे आज तरी दोन ठाकरे गणपती निमित्त एकत्र आले असले तरी आगामी काळाची रूपरेषा जाहिर करणे महत्वाचे आहे. त्यामुळे कार्यकर्त्यात स्पष्टता येवु शकेल. संभ्रम दुर होण्यात मदत होणार आहे. दोघेजन मराठी माणसाठी एकत्र येणे योग्य असले तरी एकत्र कार्यक्रम घेणे व आगामी रूपरेषा ठरविणे आवश्यक आहे.

# ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ उपक्रमातून संपूर्ण राज्यात नागरिकांची आरोग्य तपासणी

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा पुढाकार




**मुंबई/प्रतिनिधी :** गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.

या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपामध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे.

**नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता**

शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत.

**गणेशमंडळांकडून व्यापक जनजागृती**

नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे. ‘श्री गणेशा आरोग्याचा’ या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत. हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

# बालसंगोपन संस्थांतील मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी “मासूम”

## मुख्यमंत्र्यांच्या संवेदनशील निर्णयामुळे ३,३३७ मुलांना लाभ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये राहणाऱ्या समस्याग्रस्त आणि विधी संघर्षीत मुलांना मानसिक आरोग्यसेवा व समुपदेशन करण्यासाठी महिला व बालविकास विभाग एमपॉवर संस्थेच्या माध्यमातून ‘‘मासूम‘‘ प्रकल्प राबवित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील निर्णयामुळे या प्रकल्पाचा आजपर्यंत ३,३३७ मुलांना लाभ झाला असून एकूण ९५९३ वैयक्तिक समुपदेशन सत्रे पार पडली आहेत.

महाराष्ट्रातील महिला व बालविकास विभाग राज्यातील बालकल्याण व मानसिक आरोग्याच्या कार्याला बळकटी देण्यासाठी, आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या या उपक्रमामार्फत ‘मासूम’ प्रकल्प राबवीत आहे. या प्रकल्पांतर्गत अडचणीत असलेल्या व विधी संघर्षीत मुलांना, जे बाल संगोपन संस्थांमध्ये राहतात, त्यांना मानसिक आरोग्य सेवा व समुपदेशन पुरवले जाते. हा सार्वजनिक-खाजगी भागीदारीचा उपक्रम, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आला आहे.

सेवेची भावना या उद्देशाने व बांधिलकीने व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा, श्रीमती नीरजा बिर्ला यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या प्रयत्नातून १८० दशलक्षाहून अधिक लोकांपर्यंत पोहोचून, हे दक्षिण आशियातील मानसिक आरोग्य साक्षरता, क्षमता-वृद्धी आणि सामुदायिक संपर्कावर लक्ष केंद्रित करणारे सर्वांत मोठे खासगी व्यासपीठ ठरले आहे.

महिला व बालविकास विभाग सोबतच्या सामंजस्य करारानंतर हा प्रकल्प मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर आणि नाशिक या विभागांमध्ये राबवला जात आहे. एकूण १९ बालसंगोपन संस्थांना पाच मानसशास्त्रज्ञाच्या टीमकडून सेवा दिल्या जात आहेत. या प्रकल्पांतर्गत मानसशास्त्रज्ञ रोटेशन पद्धतीने सीसीआयला भेट देतात, स्तिथीपरत्वे समुपदेशन करतात, मुलांचे मानसिक आरोग्य स्क्रिनिंग करतात आणि गरजेनुसार थेरपी सेवा पुरवतात. याशिवाय गंभीर प्रकरणांमध्ये बालकल्याण समिती आणि किशोर न्याय मंडळाला तज्ज्ञांचे सहकार्य दिले जाते. थेरपिस्ट काही मुलांच्या आरोग्य आणि मानसिक परिस्थितीनुसार त्यांचे तणाव मापन पट्टी, आक्रमकता मापन पट्टी , स्थिती-गुणधर्म चिंतामापन चाचणी, मानसिक आरोग्य व कल्याण मापन पट्टी यांसारख्या साधनांद्वारे सखोल परीक्षण केले जाते.

मुलांच्या कुटुंबियांनाही समुपदेशनाची सुविधा दिली जाते. पालकांचे समुपदेशन केल्याने , मुले घरी परतल्यावर त्यांना पुर्वीप्रमाणे मोकळे वातावरण मिळेल हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. मासूम प्रकल्प हा राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये मानसिक आरोग्य सेवांना बळकटी देणारा ठरला असून मुलांच्या पुनर्वसन प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

या प्रकल्पासंदर्भात व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा नीरजा बिर्ला म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील संस्थांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या मानसिक आरोग्याला दिलेले प्राधान्य हे दूरदर्शी नेतृत्वाचे द्योतक आहे. या सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे चे कार्य म्हणजे अडचणीत असलेल्या व विधी संघर्षीत मुलांना त्वरित ट्रॉमा रिलिफ व सर्वसमावेशक मानसशास्त्रीय आधार देणे. प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञांच्या मदतीने विद्यमान प्रणालीला बळकटी देऊन मुलांच्या पुनर्वसन व समाजात पुन्हा समावेशक होण्यासाठी सुरक्षित व सहाय्यकारी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

# नाट्यपरिषद करंडक एकांकिका स्पर्धेत ‘‘ड्रायवर’’ ने मारली बाजी

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्यावतीने आयोजित ‘‘नाट्यपरिषद करंडक‘‘ एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी लातूर केंद्रावर पार पडली. दि. २४ ऑगस्ट रोजी राजर्षी शाहू महा. च्या सभागृहात पार पडलेल्या या स्पर्धेत राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अमोल साळवे लिखित व अनील कांबळे दिग्दर्शीत ‘‘ड्रायवर‘‘ या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावत अंतिम फेरी गाठली आहे, असे परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी जाहीर केले.




दि. १५ ते १८ सप्टेंबर दरम्यान मुंबई येथे अंतिम फेरी पार पडणार असून लातूर केंद्रावर झालेल्या प्राथमिक फेरीत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदवला होता. मात्र यात सात संघांनी प्रत्यक्ष सादरीकरण केले. नाट्यपरिषदेच्या मध्यवर्ती शाखेच्यावतीने केवळ अंतिम फेरीत जाणाऱ्या एकांकिकेची निवड केली जाणार होती. परंतु लातूर महानगर शाखेच्यावतीने उर्वरित दोन क्रमांक व वैयक्तिक पारितोषिके जाहीर करण्यात आली. त्याप्रमाणे द्वितीय क्रमांक रसबहार संस्थेच्या ‘‘मैं वारी जावा‘‘ या एकांकिकेस तर तृतीय क्रमांक कलोपासक मंडळ या संस्थेच्या ‘‘यथार्थ‘‘ या एकांकिकेस मिळाला. दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक अनील कांबळे, द्वितीय अविष्कार गोजमगुंडे तर तृतीय अश्विन देसाई यांना मिळाले. पुरुष अभिनयाचे प्रथम पारितोषिक संदीप घुगरे, द्वितीय रवी आघाव तर तृतीय अशितोष खरवळे यांना तर स्त्री अभिनयाचे प्रथम पारितोषिक रिया गित्ते, द्वितीय क्षितिजा रसाळ तर तृतीय निकिता कोकाटे यांना मिळाले.

अतिशय रंगतदार झालेल्या या स्पर्धेचे परीक्षण तुळजापूरचे प्रा. संभाजी भोसले व सांगलीचे प्रशांत गोखले यांनी केले. या स्पर्धेचे केंद्र प्रमुख म्हणून ॲड. शैलेश गोजमगुंडे यांनी तर समन्वयक म्हणून प्रा. दिपक वेदपाठक व डॉ. मुकुंद भिसे यांनी काम पाहिले.विजेते संघ व कलाकारांचे बाळकृष्ण धायगुडे,नाट्य समीक्षक अनिल पुरी सुरेश गीर,बळवंत देशपांडे,भारत थोरात,विजय मस्के, प्रमोद कांबळे, अजय गोजमगुंडे,सुरेंद्र अपसिंगेकर, उदय गोजमगुंडे, व नाट्यपरिषदेच्यावतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

# गणेशोत्सव


गणपती बाप्पा म्हटले की आपल्या सर्वांच्या डोळ्यांसमोर अगदी लहान मुलांपासून ते आज्जी आजोबा पर्यंत सर्वांचे लाडके आराध्य दैवत असलेली उंदीरमामावर विराजमान झालेली , गोलगरगरीत तुंदिलतनू सावरणारी, सुपासारखे मोठ्ठे मोठ्ठे कान, एकदं , छोटे पण तेजस्वी डोळे, एका हातात मोदक ,दुसऱ्या हातात खडग , तिसऱ्या हातात परशु तर चौथा हात भरभरून आशीर्वाद देणारी, सुंदर, कोटी सूर्यां इतकी तेजस्वी मूर्ती साकारते. सर्वांचा अगदी जवळचा, आपला वाटणारा हा बाप्पा! सर्व देवांपेक्षा वेगळा दिसणारा, तरीही सुंदर वाटणारा असा हा बाप्पा. हा एकदंत, वक्रतुंड, पिंगाक्ष, गजवक्र, लंबोदर, विनायक, राजेंद्र, भालचंद्र ...अशा असंख्य नावानी ओळखला जातो . त्याची माहिती ,कथा आपण जाणून घेऊच पण त्यापूर्वी गणेश जयंती आणि गणेश चतुर्थी

**या दोन दिवसात काय विशेषता आहे हे जाणून घेऊ.**

गणेश जयंतीला बाप्पांचा जन्म झाला होता असे मानले जाते तर संकष्टी चतुर्थीला, गणेश चतुर्थीला गणपती बाप्पा कैलासावरुन पृथ्वीवर अवतरले असे मानले जाते. म्हणूनच या दोन्ही दिवसांना भारतीय संस्कृतीत धार्मिक दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे.

गणेश जयंती माघ शुक्ल चतुर्थीला साजरी केली जाते तर गणेश चतुर्थी भाद्रपद शुद्ध चतुर्थीला साजरी करतात. दोन्ही दिवस गणपतीच्या जन्मोत्सव म्हणुनच मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. गणेश जयंतीच्या दिवशी अनेक ठिकाणी गणेश याग केले जातात. मोठ्ठा यज्ञ करून त्यात तूप, लाह्या यांची आहुती देऊन गणपती मंत्र व अथर्वशीर्षाची सहस्त्र आवर्तने ब्राह्मणांच्या कडून केली जातात. त्याला लाल रंगाची फ ुले आवडतात, दुर्वा आवडतात. म्हणून त्यांचा हार करून घातला जातो. त्याला मंदार, अनंत जास्वंद, पारीजातक यांची फुले खुप प्रिय आहेत तर शमीची पाने, बेल, आघाडा, दुर्वा यासारखी पानेही खुप आवडतात. मोदक,लाडू हे गणपती बाप्पांचे आवडते खाद्य!त्याचा नैवेद्य दाखवून प्रसाद वाटला जातो आणि मनोभावे नमस्कार करून प्रार्थना च प्रसन्न होतो आणि यश, कीर्ती, बुद्धी, बुद्धी, प्रगती, ऐश्वर्य, सुख, शांती यांचा लाभ होतो अशी भक्तांची श्रद्धा आहे.

गणपती हा भगवान शंकर आणि पार्वती यांचा मुलगा. कैलासावर शंकर आणि पार्वती रहात असताना शंकर काही कारणास्तव बाहेर गेले होते. पार्वतीने तिच्या सोबतीसाठी, संरक्षणाच्या



साठी म्हणून तिच्या अंगावरील हळदी पासून एक लहान बाळाची सुंदर मूर्ती बनवली.

तिच्यात फुंकर मारून सजीव केले . आणि तो इतका सुन्दर होता की तिने त्याला आपला पुत्रच मानले . एकदा तीला स्नानाला जायचे होते . आजूबाजूला कोणीच दिसत नव्हते म्हणून तिने गणपतीला दरवाजापाशी खेळत

लक्ष ठेवण्यास सांगितले आणि कोणीही आले तरी त्यांना आतमध्ये सोडू नकोस असे बजावले. तो आईचा आज्ञाधारक पुत्र !

थोडयांच वेळात नेमके साक्षात शंकर घरी परत आले . पार्वतीला भेटण्यासाठी लगबगीने आत

जाऊ लागले तेंव्हा गणेशाने त्यांना अडवले . शंकरांनी खुप समजावून पाहिले ,त्यांचे वाहन असलेल्या नंदीने पण खुप समजावले, पण गणपती त्यांचे ऐकायला तयारच नव्हते . शेवटी शंकरांना इतका राग आला की त्यांनी रागारागात त्रिशुळाने त्यांचे मस्तक कापले. ते खूपच दुरवर जाऊन दिसेनासे झाले. थोड्याच वेळात पार्वती बाहेर आली. तिने हे सारे पाहिले आणि ती अतिशय संतापली. माझ्या पुत्राला ठार मारण्याचे धाडस कसे केले, म्हणून आक्रोश करू लागली. शंकरांना सर्व लक्षात आल्यावर चुक समजली, त्यांनी तिची माफीही मागितली पण ती ऐकायला तयारच नव्हती . तो निष्पाप जीव माझ्या आज्ञेचे पालन करत होता, त्याची काहीही चुक नसताना त्याला शिक्षा झाली, आता काहीही करून तो जिवंत करा असे म्हटल्यावर शंकरांनी त्यांच्या सेवकांना आजूबाजूला तो सजीव दिसेल त्याचे मस्तक आणा असा आदेश दिला. त्यावेळी सेवकांना जंगलात एक बालहत्ती दिसला. त्यांनी त्याचे मस्तक शंकरांना आणून दिले. त्यांनी ते धडावर ठेवले आणि त्यात प्राण फुंकले. आणि त्याला पुन्हा जिवंत केले . म्हणून गणपतीचे मस्तक गजासारखे आहे. त्यामुळेच त्यांना गजानन म्हणूनहि ओळखू लागले. त्याला बुद्धीची देवता म्हणून ओळखले जाईल,घरोघरी त्याची मूर्ती स्थापन करून पूजा केली जाईल आणि सर्व मंगल प्रसंगी सर्व देवतांच्या आधी त्याचे पूजन केले जाईल असा आशीर्वाद सुद्धा दिला. म्हणूनच कोणत्याही शुभ प्रसंगाची सुरुवात आपण गणेशपूजनानेच करतो. त्याची पूजा करून कोणत्याही कार्याचा शुभारंभ केला की कार्यात कोणतेही अडथळे येत नाहीत आणि कार्य निर्विघ्नपणे पार पडते .भक्तांवर

**कोणतेही संकट येत नाही .**

पूर्वी गणेश चतुर्थीला म्हणजेच भाद्रपद मासात समाजात एकी निर्माण व्हावी, लोकांचा आनंद आणि उत्साह वाढावा म्हणून लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी हा उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली. गावात गणपतीची उत्सव मूर्ती बसवून त्याची प्रतिस्थापना आणि पुजा करून सर्व लोकांना एकत्र जमवून विचारांची देवाण घेवाण केली जायची, मूर्तीची मनोभावे पूजा करून नैवेद्य दाखवला जायचा, प्रसाद वाटला जायचा आणि अनंतचतुर्दशीला या मूर्तीचे जड अंत:करणाने विसर्जन केले जायचे. आजही त्यांनी सुरु केलेली ही परंपरा खुप मोठ्या प्रमाणात मोठ्या धुमधडाक्यात साजरी केली जाते. पण वरचेवर त्यांचा मूळ उद्देश बाजूला जाऊन त्याला व्यापारी ,बाजारी आणि बिभीत्स स्वरूप येऊ लागले आहे यांची खंत वाटते.

वर्गणी जबरदस्तीने खंडणी वसुल केल्यासारखीकरून कित्येक गल्लीबोळात नावापुरते गणपती बसवून मोठ्याने गाणी लावून ठेवतात आणि विसर्जन केल्यानंतर जमा झालेल्या वर्गणीच्या पैशातून चक्क पार्ट्या करतात बरेचदा. खरोखर लाज वाटते हे सांगतानासुद्धा पण ही वस्तुस्थिती आहे. यापेक्षा अशा गोळा झालेल्या वर्गणीतून एखाद्या गरजू संस्थेला मदत केली तर किती छान होईल? समाजसेवाही घडल्याचे पुण्य गणपतीबाप्पा नक्कीच देतील.

गणपती आणताना,विसर्जन करताना एकापेक्षा एक मोठ्ठ्या, फटाक्यांच्या माळा, प्रदूषण करणारे फटाके चढाओढीने लावतात. त्यामुळे आनंद होण्यापेक्षा त्रासच जास्त होतो.ध्वनी प्रदूषण,वायू प्रदूषण होऊन प्रसंगी कित्येकाना

अक्षरशः दुखणी येतात. हे योग्य नाही ना? खरेतर सर्वच सणाना, उत्सवांना फटाके फोडणे किंवा डीजे ठराविक आवाजापेक्षा मोठ्या आवाजात लावायला बंदी करायला हवी.

देवाची गाणी किंवा भजने, यासारखे कर्णमधुर संगीत ऐकण्या ऐवजी डीजे वर कर्णकर्कश्य आवाजात लावण्या किंवा सिनेमा मधील

फालतू गाणी लावून त्यावर अंगविक्षेप करत नाचतात, अगदी गल्लोगल्ली छोटे,मोठे मंडप घालून आरास करतात, स्पर्धेने देखावे साकारतात.त्यामुळे नागरिकांची,वाहतुकीची खुप गैरसोय आणि कोंडी होते . लहान बाळे, आजारी माणसे,वयोवृद्ध माणसांची तर दखलच घेतली जात नाही, मुलांच्या परीक्षा, अभ्यास असतात,त्यांना त्रास होईल याची आजिबात जाणीव नसते याची खरोखर लाज वाटते . आणि वाईट सुद्धा वाटते.हे सारे आपणच बदलायला पाहिजे.

**काही गावात अलीकडे एक गाव एक**

गणपती ही संकल्पना राबवली जात आहे. त्यांचे खरोखर कौतुक वाटते.आता मोठ्या शहरांमधून दूरच्या अंतरामुळे, गर्दी, वाहतुकी मुळे हे शक्य नाही पण किमान एका विभागात एक गणपती तरी बसवावा. त्यामुळे लोकांना, रहदारीला त्रास होणार नाही, उलट आनंद वाढेलच. त्या निमित्ताने समाज उपयोगी कामे करून, धार्मिक व सामाजिक कार्यात आपल्यामुळे आनंद निर्माण होईल असे करावे स्वतः पण आनंद मिळवावा व इतरांनाही वाटावा तरच या उत्सवांचा खरा उद्देश सफल होईल. गणेश जयंती,गणेशोत्सव आणि सारेच उत्सव जर सर्वांनी एकीने आणि इतरांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही अशी काळजी घेऊन साजरा केला तर यांचा आनंद नक्कीच द्विगुणीत होईल. आणि लोकमान्य टिळक यांचा उद्देश सफल होईल. प्रयत्न तरी करून पाहू या. मग उशीर कशाला? शुभस्य शीघ्रम! यंदाच्या गणेशोत्सवातच करूया ना सुरुवात..




सौ. स्नेहा मुसरीफ ,पुणे .

# शिक्षणातून आव्हाने पेलण्याची ताकद निर्माण व्हावी

ऐसपैस शिक्षण, संदीप वाकचौरे

शिक्षणाने माणसांच्या आयुष्यात नेमके काय परिवर्तन घडते ? माणसांच्या आयुष्यात शिक्षण नेमके कशासाठी? माणसांच्या आयुष्यात शिक्षण आवश्यक आहे का? शिक्षणाने माणसांमध्ये खरेच शहाणपण, विवेक येतो का ? असे प्रश्न कोणी विचारले, तर त्याची अनेक उत्तरे होकारार्थी जशी येतील त्याप्रमाणे नकारात्मक देखील येतील. शिक्षण माणसाला जेव्हा गरजेचे आहे असे वाटू लागते, तेव्हा शिक्षणाकडून निश्चित परिवर्तनाची अपेक्षा होती. शिक्षणाचे मोल जेव्हा लक्षात आले तेव्हा शिक्षणाचा प्रसार आणि प्रचाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची भूमिका समाजातील धुरिणांनी घेतली असल्याचा आपला इतिहास आहे. त्यांनी अत्यंत समर्पण भावनेने शिक्षणसंस्था उभारण्याचा प्रयत्न केला. शिक्षण संस्था उभारताना, शिक्षणाची द्वारे गरिबांसाठी खुली करताना शिक्षणाचे निश्चित केलेले ध्येय साध्य करण्याची अपेक्षा होती. शिक्षणाची ध्येये साध्य करताना उद्दिष्टांचा विचार करून विषयांची संरचना केली गेली. त्यासाठी विविध गाभाघटक, जीवन कौशल्य, मूल्यांचा विचार केला गेला. मात्र या गोष्टींचा अभ्यासक्रमात समावेश असला तरी त्या खरेच साध्य झाल्या आहेत का ? याचाही शोध घेण्याची वेळ आता आली आहे. शिक्षणाकडून अपेक्षा असल्या, तरी त्या जोवर साध्य होत नाही तोवर शिक्षणातून परिवर्तनाची अपेक्षा करता येणार नाही.

स्वातंत्र्यानंतरही आपल्या देशात शिक्षणाची उद्दिष्टे खरच साध्य झाली आहेत का ? याचा विचार केला तर उत्तर नकारात्मक येण्याची शक्यता अधिक. देशात गेल्या काही दशकात ज्याप्रमाणे जाती, धर्माचे व भाषिक संघर्ष उभे राहात आहेत. संघर्ष विचारांपेक्षा माणसं मारली जाण्यापर्यंत पोहोचली आहेत. माणूस मारला तर विचार मरत नाही हे इतिहासाने समोर आणले आहे. माणसे मारण्यासारख्या गोष्टी करण्यापर्यंत मजल जाणे हे शिक्षितपणाचे लक्षण मानायचे का ? जे शिक्षण हिंसेचे समर्थन करते त्या शिक्षणाला शिक्षण म्हणायचे का ? त्याचबरोबर देशापेक्षा राजकीय सत्ता अधिक महत्त्वाची ठरू लागली आहे. देशात जेव्हा शिक्षणाचा प्रसार नव्हता तेव्हा राज्यकर्त्यांसाठी देश व समाजाचा



विकास केंद्रस्थानी होता. वर्तमानात सत्तेसाठी माणसांच्या जडणघडणीकडे होणारे दुर्लक्ष अधिक चिंताजनक आहे.

उत्सवामागील विचार- आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लोकमान्य टिळक यांनी गणेश उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्या उत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रप्रेमाचा विचार महत्त्वाचा ठरला. गुलामीच्या बेड्या तोडण्यासाठी, लोक एकत्रित येऊन समाजाचे भले व्हावे यासाठी लोकमान्यांनी गणरायाच्या उत्सवाच्या माध्यमातून स्वातंत्र्याचे समर अधिक प्रज्वलित करण्याचा प्रयत्न केला. त्या गणेश उत्सवामागील विचार प्रेरणेचा, धारणेचा उपयोग करून वर्तमानात पाऊलवाट चालण्याची गरज होती. शिक्षण घेतलेल्या समाजाने टिळकांच्या विचारांचा योग्य अर्थ आणि त्यामागील भाव लक्षात घेऊन वर्तमानात पुन्हा एकदा उत्सवांचा विचार करण्याची गरज आहे. आज टिळकांनी सुरू केलेल्या गणेश उत्सव साजरा करत असताना नव्या युगासमोरील आव्हानांचा विचार करण्याची गरज आहे. त्यासाठी शिक्षणातून जाणीवपूर्वक विवेकाची पेरणी करण्याची वेळ आली आहे. आपल्याकडे असलेल्या धार्मिक कार्यक्रमांचा उपयोग समाजात सामाजिक शहाणपण, लोकहित, समाज जागृती, लोकविचारांची पेरणी, राष्ट्रहित, लोकशाही व्यवस्था अधिक परिपक्व होईल यासाठी प्रयत्नांची गरज अधोरेखित होते आहे. त्यामुळे उत्सवाच्या निमित्ताने आपण नव्या वाटा चालताना समाज एकसंघ राहणे आणि राष्ट्रहिताला अधिक प्राधान्य देण्याची गरज आहे. प्रत्येक उत्सव, सणाच्या निमित्ताने विचाराची पेरणी होऊ शकेल अशा स्वरूपात पुनर्विचार करण्याची गरज आहे. मुळात शिक्षणातून विचार करण्याची क्षमता वृद्धिंगत करण्याची आवश्यकता आहे.

शिक्षणाने माणूस घडवला जाणे गरजेचे आहे. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणे अपेक्षित आहे. व्यक्तिमत्त्व फुलवणे, बहरवणे हे शिक्षणाच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट आहे. आज आपल्या समाजात शिक्षणाच्या संदर्भाने पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. आपल्या अवतीभोवतीची माणसे आहेत, पण ती फक्त माणसांची गर्दी आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला माणूस म्हणून आकार मिळाला आहे का? याचाही शोध घ्यायला हवा. माणसांचे शिक्षण, पदव्यांची संख्या वाढते आहे आणि शिकलेल्या माणसांची व्यक्तिमत्त्वे खुजी होत चालली आहेत. समाज व राष्ट्रापेक्षा 'मी'ला अधिक महत्त्व आले आहे. स्वहित सर्वोच्चस्थानी आले आहे. स्वहितापुढे साराच विचार हरवला आहे. दुर्दैवाने शिक्षित माणसांच्या विचाराच्या केंद्रस्थानी स्वहिताचा विचार अधिक आहे. शिकलेली माणसे देशहितापेक्षा स्वहितासाठी देशाची अत्यंत गोपनीय माहिती विकत आहेत. त्यातून त्यांना आर्थिक श्रीमंतीची वाट चालावी असे वाटते आहे. आपणच आपली माणसे मारतो आहोत. आपणच आपले शत्रू बनलो आहोत. आपल्याला आपल्या लोकांना फसविताना काहीच वाटेनासे झाले आहे. आपल्या लोकांच्या जीवाशी अनेकजण खेळत आहेत. लोकहिताचा विचार हरवला आहे. सामान्य माणसांच्या हृदयात जितके राष्ट्रप्रेम, समाजप्रेम आहे, तितका विचार शिकलेल्या माणसांच्या मनात प्रतिबिंबीत होताना दिसत नाही. सामाजिक जीवनात शहाणपणाचा तर फारच अभाव दिसतो. आपल्या सार्वजनिक आणि व्यक्तिगत जीवनात विवेकाचा अभाव आहे हे पुन्हा पुन्हा अधोरेखित होते. व्यक्तिमत्त्व घडवण्याची अपेक्षा असताना माणसे अधिक खुजी असल्याचे दिसत आहे. व्यक्तिमत्त्व घडवणे म्हणजे नेमके काय? व्यक्तिमत्त्वाला आकार देणे म्हणजे माणसाला अधिक विवेकी बनवणे आहे. माणसे शिक्षणातून विवेकी बनली की, व्यक्तिगत जगण्यातील आणि समाजाचे देखील अनेक प्रश्न आपोआप सुटायला मदत होते. आज आपल्या समाजात जे अनेक प्रश्न आहेत, त्याच्या मुळाशी अविवेकाची वाट हेच कारण आहे. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेतून माहिती शिकवण्यापेक्षा विचार करायला शिकवणे गरजेचे आहे.त्यामुळे शिक्षण घेऊनही

# सौंदर्य व प्रेम एकमेकांवर आधारलेले



सौंदर्य व प्रेम एकमेकांवर आधारलेले आहेत, जिथे प्रेम आहे तिथे सौंदर्य आहे. सत्यम, शिवमसोबत परमात्माचे तिसरे वैशिष्ट्य सुंदरम असल्याचे सांगण्यात आले आहे. ते सुंदरच नाही पण सौंदर्यांचा मुळ स्त्रोत त्याचे अस्तित्व, सौंदर्य शाश्वत आहे. जग त्या सौंदर्याचे प्रत्यक्ष दिग्दर्शन आहे. शाश्वत सौंदर्याचे कलम त्यातूनच प्रस्फुटित होऊन सर्व जड-चेतनात सौंदर्य अभिसिंचन करते. वैदिक दर्शनानुसार रूपम रूपम प्रतिरूपो बभूव म्हणजे प्रकृतीची अव्यक्त अवस्था दर्पण आहे ज्यात चैतन्य ज्योतीचा आभास होतो. जितके मूर्त रूप आहेत ते सर्व त्या परब्रह्मरूपी ज्योतीचे प्रतिबिंब आहेत. त्याच एक परमात्म्याच्या परम ज्योतीने सुर्य व चंद्र प्रकाशमान आहेत. रात्र आपल्या असंख्य नेत्ररूपी ताऱ्यांनी त्या सौंदर्याचे दर्शन करते. परमात्म्याच्या अंश असल्याच्या नात्याने जीवात्मा सुद्धा प्रत्येक सुंदर वस्तुकडे आकर्षित होतो. प्रकृतीचे मनोरम दृश्य, हिरवळ, फुलांचे उद्यान, नदी, पर्वत इत्यादी पाहून कुणाचे मन फुलणार नाही? सौंदर्याकडे आकर्षण अंतरतम्ची अभिव्यक्ती आहे, जी शाश्वत सौंदर्याचा शोध घेते. कबीर त्या शाश्वत सौंदर्याला चोहीकडे पाहतात- लाली मेरे लाल की, जित देखौं तित लाल। सौंदर्य प्रेमींनी त्या सौंदर्यास नारीत पाहिले व त्यात ब्रह्माची कल्पना केली. असे मधुर व कोमल अवलंबन ब्रह्माव्यतिरिक्त दुसरे कुणीही असू शकत नाही कारण ते प्रेमरूप आहे, परम सुंदर आहे व त्याचे सौंदर्य विश्वाच्या चराचरात आहे. त्या दिव्य सौंदर्याचा साक्षात्काराने अज्ञानरूपी अंधार नष्ट होतो, जन्म-जन्माचे पाप धुतले जातात. प्रेम मिळवण्यासाठीच ब्रह्माने सृष्टीची रचना केली व जीवाच्या हृदयात प्रेम निर्माण केले. एकीकडे हे प्रेम साधकाच्या हृदयातील सर्व कलुषित भावना, वासना व आकांक्षा नष्ट करुन हृदय स्वच्छ करते. दुसरीकडे त्याच्या हृदयास त्या अनंत सौंदर्य रसाने परिपूर्ण करते. प्रेम खऱ्या प्रेमीस कधीच थकू देत नाही. ते त्यास नित्य नवीन शाश्वत सौंदर्याची अनुभूती करुन देत राहते.



## दोन, तीन की चार.. एकावेळी जास्तीत जास्त किती केळी

खायला हवी? जाणून घ्या... केळ्यांमध्ये अनेक पोषक घटक असल्याने ती दररोज खायला हवीत. दररोज एक केळ खाल्याने वजन नियंत्रणात कमी करण्यास मदत होते. तर जास्त केळी खाल्ल्याने वजन वाढते. एकावेळी दोन तीन की चार केळी खायला हवीत? असा प्रश्न तुम्हालाही पडला आहे का? आज जाणून घ्या एकावेळी जास्तीत जास्त किती केळी खायला हवीत.

केळी खाण्याचे फायदे काय आहेत? - केळी खाल्याने हाडे मजबूत होतात. - नैराश्येपासून बचाव करण्यासाठी केळी फायदेशीर आहेत.- कोरडा खोकला येत असेल तर एखादं केळ खावं.

# घरच्या घरी बनवा गूळ-शेवेचे लाडू, एकदा खाल्ल्यानंतर प्रत्येकजण करेल कौतुक

भारतात अनेक प्रकारचे लाडू बनवले जातात. काही लोक रवा घालून शेव लाडू बनवतात तर काही लोक बेसनाने बनवतात. चवीनुसार काजू, गुलाबपाणी, दूध पावडर, वेलची इत्यादी अनेक गोष्टी चवीसाठी घालून लाडू बनवले जातात. अशा अनेक प्रकारातील एक प्रसिद्ध लाडू म्हणजे शेव. शेव लाडू कमी वेळात बनवता येतात. याशिवाय हे लाडू अगदी कमी पदार्थात, जे झटपट बनवता येतात. या रेसिपीचे वैशिष्ट्य म्हणजे रिफाइंड साखरेऐवजी गूळ वापरला जातो, ज्यामुळे तो एक आरोग्यदायी गोड पदार्थ बनतो. शेव गुळापासून बनवलेले लाडू कसे बनवायचे ते जाणून घेऊया.

लागणारे साहित्य

कृती - एका भांड्यात बेसन घेऊन पाण्याने घट्ट पीठ मळून घ्या.

मळल्यावर तूप लावून परत एकदा मळून घ्या.

पुढे शेव मेकरला तुपाने ब्रश करा. बेसनाचा गोळा फोडून शेव मेकरमध्ये ठेवा.

गॅसवर पॅन ठेवा आणि तेल गरम करा.

शेव मेकरमधून शेव थेट गरम तेलात टाका आणि हलके सोनेरी होईपर्यंत तळा.

लक्षात तळताना गॅसची आच जास्त ठेवू नका. मध्यम आचेवर तळून घ्या.

शेव तळून, प्लेटमध्ये काढून थंड झाल्यावर फोडून घ्या.

एका पातेल्यात थोड्या पाण्यात गूळ टाकून वितळवून घ्या.

एक तार गुळाचे चाशनी तयार करा.

चाशनी तयार झाल्यावर त्यात तुटलेली शेव घाला.

गॅस बंद करा आणि गूळ मिसळून शेव प्लेटमध्ये काढा. मिश्रण थंड होऊ द्या.

मिश्रण थंड झाल्यावर पुढे तुपाने हात ग्रीस करा.

लाडू बनवण्यासाठी शेव मिक्स हातात घ्या आणि त्याला लाडूचा आकार द्या.

काजू घालून लाडू

जर तुम्हाला लाडूमध्ये काजू घालायचे असतील तर काजू तुपात भाजून त्याचे छोटे तुकडे करा. शेव तळून झाल्यावर आणि फोडल्यानंतर तुपाच्या पाकात शेव सोबत काजू मिक्स करावे. यामुळे शेव लाडू अधिक कुरकुरीत, चवदार आणि पौष्टिक होतील.



## स्वस्थ त्वचेकरता काय खावे? डॉक्टर टीप्स



### डार्क चॉकलेट

डार्क चॉकलेट निश्चित रूपानं तुमच्या त्वचेकरता लाभदायक आहे. कॉकोया फ्लावानोल सारख्या अँटीऑक्सीडेंट ने भरलेले असल्याने डार्क चॉकलेट तुमच्या त्वचेला हाइड्रेट ठेवते शिवाय साफ आणि स्वस्थ ठेवण्यात साहाय्यक आहे.

कॉकोया तुमच्या त्वचेला मुलायम बनवतं आणि सोबतच चेहे-यावर सुरकुत्या सुध्दा लवकर येउ देत नाही परंतु तुम्ही याचे सेवन जास्त प्रमाणात करू नका रोज एका सिमीत मात्रेत याचे सेवन करणे निश्चितच तुमच्याकरता फायदयाचे राहील. **(क्रमश. )**




## विनोद

बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.

राजू - माझ्याच वयाचे आहेत.

बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.

राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## संदेश

Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.

– डॉन प्याट


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणेष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः॥**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. पुरा केलेला हिशोब, फेडलेला
४. सुखी माणसाचे वस्त्र
८. तीन पानांचे म्हणीतील झाड
१०. बोकड
१२. घाबरणे
१३. दशावतारातील त्रिविक्रम
१६. राजाचा कालावधी
१९. पौर्णिमा
२०. आजूबाजूला
२१. विषमच्या विरुद्ध
२३. मेघसारखा सावळा-श्रीकृष्ण
२५. घरातील मोठी माणसे
२७. चेहऱ्यावरील तेज
२९. युद्धात माघार न घेणारा वीर
३१. अवधान, लक्ष
३२. नवरदेव
३४. छत्रपतींचा शूर सेनापती-नेताजीचे आडनाव
३६. गरीब, निर्धन
३७. पार्वतीचे एक नाव, कजाग बाईचे विशेषण
३९. दणकट, भक्कम
४१. धन्यवाद
४२. प्रजा
४३. नक्की, खात्रीने
४४. स्पष्टवक्ता
४६. फाक, काप, तुकडा, ढीग
४८. ज्वाला, अग्नी
४९. काचेला आरसा करणारा
५०. इंग्रजीत धडा
५२. अभिनेता
५३. नम्र, वाकलेला
५५. भेदभाव
५८. ओढ्यावरील कच्चा पूल
६०. विदुराला हिणवताना केला जाणारा उल्लेख
६१. हवेतील शीतलता
६३. चीजवस्तू
६५. चकाकी
६६. जुळे
६८. हिंदीत दीर
६९. शिंका आणणारी तंबाखू
७०. दोऱ्याने सांधणारी
७१. कवाड
७२. गेरू
७३. सत्य
७४. सदोदित, वरचेवर
७७. दुसऱ्यावर केलेले उपकार
७९. हसतमुख
८०. पुष्कळ, वारेमाप
८२. नियमित यात्रेला जाणारा
८३. मत देणारा
८४. पाणी, रस

### उभे शब्द

१. झटक्यात, हा हा म्हणता
२. हात
३. शक्ती, बळ
५. औषध
६. नमस्कार
७. एक चतुर्थांश
८. पंख
९. एकूणात प्रमाण
१०. फुरसत, सवड
११. केसांची गुंतलेली बट
१४. चौक
१५. त्वरा, घाई
१७. जास्वंद
१८. या देशाच्या हरतऱ्हेच्या स्वस्त वस्तूंनी भारतीय बाजारपेठेवर अतिक्रमण केले आहे
२०. आश्रय, टेकू
२२. चाळीस शेर
२३. निवासस्थान
२४. काळसर
२५. अरण्य
२६. चटकन
२८. कष्ट, मेहनत
३०. रावणाची बहीण
३१. वजन
३३. लोखंडी वस्तू बनवणारा
३४. झाडाभोवतीचा कट्टा
३५. कारस्थान
३६. एक अप्सरा
३८. मातृभाषा
३९. पंकज
४०. वाळा
४१. सुस्ती, कंटाळा
४३. सहस्त्रवेळा
४४. पळून गेलेला
४५. पार्थिव
४६. आचारी
४७. झटकन
४९. पातक
५१. फायदा
५४. नेत्रसुखद, मनोहर
५५. आपलेपणा, ममता
५६. वार्ताहर
५७. डमरूच्या तालावर नाचणारे माकड
५९. श्रीकृष्णाचे वडील
६२. मुदतीचा करार
६३. वर्ष, सन
६४. भ्रम, जादू
६७. एक सुगंधी वनस्पती
६९. वाईट होण्यासंबधीच्या इच्छा, शाप
७०. पुत्र, मुलगा
७१. मध्यम प्रमाण
७२. व्यवस्था, काम
७३. पिकाचा गाळसाळ
७३अ. पाच शेरासाठी एक जुने मोजमाप
७५. वेषभूषेसह केलेली तालीम
७६. अमंगल, बीभात्स
७८. पान
७९. साद, बोलावणे
८१. आवाज, गोंगाट

### आडवे उत्तरे

१.चुकता ४.सदरा ८.पळस १०.अज १२.टरकणे १३.वामनावतार १६.राजवट १९.राका २०.आसपास २१.सम २३.घनश्याम २५.वडीलधारी २७.रया २९.रणशूर ३१.भान ३२.वर ३४.पालकर ३६.ट्रंक ३७.महामाया ३९.कणखर ४१.आभार ४२.रयत ४३.हमखास ४४.फटकळ ४६.खाक ४८.जाळ ४९.पारा ५०.लेसन ५२.नट ५३.लीन ५५.आपपरभाव ५८.साकव ६०.दासीपुत्र ६१.गारवा ६३.सामानसुमान ६५.लकाकी ६६.यमल ६८.देवर ६९.तपकीर ७१.दार ७२.काव ७३.सत ७४.वारंवार ७७.परोपकार ७९.हसरा ८०.भाराभर ८२.वारकरी ८३.मतदार ८४.द्रव

### उभे उत्तरे

१.चुटकीसरशी २.कर ३.ताकद ५.दवा ६.रामराम ७.पाव ८.पर ९.सरासरी १०.अवसर ११.जट १४.नाका १५.तातडी १७.जपा १८.चीन २०.आधार २२.मण २३.घर २४.शामल २५.वन २६.लवकर २८.यातायत ३०.शूर्पणखा ३१.भार ३३.लोहार ३४.पार ३५.कपट ३६.रंभा ३८.मायबोली ३९.कमळ ४०.खस ४१.आळस ४३.हजारदा ४४.फरार ४५.कलेवर ४६.खानसामा ४७.पटकन ४९.पाप ५१.नफा ५४.नयनरम्य ५५.अपुलकी ५६.पत्रकार ५७.भागाबाई ५९.वसुदेव ६२.वायदा ६३.सल ६४.माव ६७.मरवा ६९.तळपट ७०.सुत ७१.पासरी ७२.कारभार ७३.सरवा ७३अ.पासरी ७५.रंगीत ७६.अभद्र ७८.पर्ण ७९.हाक ८१.रव




## थोडक्यात/ संक्षिप्त

### पाकिस्तान नव्हे, तर आशिया चषकात 'हा' संघ टीम इंडियावर भारी पडू शकतो

नवी दिल्ली-आशिया चषक २०२५ स्पर्धेला येत्या ९ सप्टेंबरपासून सुरूवात होणार आहे. आगामी टी- २० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर आशिया चषक स्पर्धा टी-२० फॉरमॅटमध्ये खेळवली जाणार आहे. ज्यात भारत आणि पाकिस्तान संघाला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात आहे. पण अफगाणिस्तानलाही हलक्यात घेऊन चालणार नाही. अफगाणिस्तानला युएईत खेळण्याचा चांगलाच अनुभव आहे. अफगाणिस्तानचा श्रीलंका, बांगलादेश आणि हाँगकाँगसोबत ग्रुप बी मध्ये समावेश करण्यात आला आहे.

एकापेक्षा एक फिरकी गोलंदाज असलेल्या अफगाणिस्तान संघाला युएईत खेळण्याचा चांगलाच फायदा होऊ शकतो. आयसीसी वनडे वर्ल्डकप २०२३ स्पर्धेचा थरार भारतात पार पडला होता. या स्पर्धेत अफगाणिस्तानने पाकिस्तान, श्रीलंका आणि इंग्लंडसारख्या बलाढ्य संघांना पराभूत केलं होतं. ऑस्ट्रेलियाचा संघ देखील पराभवाच्या अगदी जवळ पोहोचला होता. पण हा सामना थोडक्यात हातून निसटला होता. त्यानंतर टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेतही अफगाणिस्तानने दमदार कामगिरी केली. त्यामुळे टी-२० फॉरमॅटमध्ये अफगाणिस्तानने आपली पकड चांगलीच मजबूत केली आहे.

अफगाणिस्तानपासून भारतीय संघाला धोका?

भारतीय संघ या स्पर्धेतील सर्वात मजबूत संघांपैकी एक आहे. पण अफगाणिस्तानचा संघ भारतीय संघाला तोडीस तोड उत्तर देताना दिसून येऊ शकतो. कारण अफगाणिस्तानच्या फिरकी गोलंदाजांना या खेळपट्टीवर खेळण्याचा चांगलाच अनुभव आहे. याआधीही अफगाणिस्तानचा संघ भारतीय संघाला पराभूत करण्याच्या अगदी जवळ पोहोचला आहे, पण पराभूत करू शकलेला नाही. पण बंगळुरूमध्ये झालेल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात या दोन्ही संघांमध्ये डबल सुपर ओव्हर झाली होती. ज्यात भारतीय संघाने बाजी मारली होती. हा सामना बांगलादेशच्या हातून थोडक्यात निसटला होता. त्यामुळे यावेळी अफगाणिस्तानचा संघ भारतीय संघाला पराभूत करून इतिहास घडवणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.या स्पर्धेतील पहिला सामना अफगाणिस्तान आणि हाँगकाँग या दोन्ही संघांमध्ये होणार आहे. हा सामना ९ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल. त्यानंतर १६ सप्टेंबरला अफगाणिस्तानचा सामना बांगलादेशविरूद्ध होणार आहे. तर साखळी फेरीतील शेवटचा सामना १८ सप्टेंबरला श्रीलंकेविरूद्ध होणार आहे. जर अफगाणिस्तानचा संघ आपल्या गटात टॉप २ मध्ये पोहोचला, तर या संघाचा सामना इतर पात्र ठरलेल्या संघांसोबत होईल. जे संघ टॉप २ मध्ये येतील ते जेतेपदासाठी अंतिम फेरीत लढतील.

### आशिया कपमध्ये भारताविरुद्ध खेळणार 'हा' हिंदू भारतीय क्रिकेटर, गाजियाबादशी आहे खास कनेक्शन

दिल्ली-आशिया कप २०२५ ला ९ सप्टेंबर पासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेतील दुसरा सामना हा १० सप्टेंबर रोजी भारत विरुद्ध यूएई यांच्यात खेळवला जाईल. दोन्ही संघांचा हा स्पर्धेतील पहिलाच सामना असल्याने फॅन्सची नजर ही भारतीय खेळाडूंवर राहील. मात्र यातील खास गोष्ट अशी की गाझियाबादच्या एका युवा क्रिकेटचं सिलेक्शन हे यूएईच्या संघात झालंय. एवढंच नाही तर तो १० सप्टेंबर रोजी होणाऱ्या सामन्यात भारताविरुद्ध खेळण्यासाठी उतरू शकतो.

गाजियाबादमध्ये झाला आर्यंशचा जन्म : २० वर्षीय आर्यंश शर्माचा जन्म हा गाजियाबादमध्ये झाला होता. यूएईच्या आशिया कप २०२५ च्या संभाव्य संघात २ विकेटकिपरचा समावेश झाला असून यातील एक विकेटकिपर आर्यंश शर्मा आहे. आर्यंशचा जन्म २ डिसेंबर २००४ रोजी उत्तर प्रदेशच्या गाजियाबादमध्ये झाला होता. तो केवळ दोन वर्षांचा असताना आपल्या कुटुंबासोबत यूएईमध्ये गेला. दुबईमध्ये शिक्षण घेत असताना त्याची क्रिकेटमध्ये आवड निर्माण झाली आणि कुटुंबाच्या मदतीने त्याने क्रिकेटमध्ये आपले करिअर घडवले. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान विरुद्ध होणाऱ्या तिरंगी मालिकेसाठी यूएईने संघ जाहीर केला आहे. २९ ऑगस्ट पासून ही मालिका होणार असून यात यूएईने जाहीर केलेला संघ आशिया कपसाठी सुद्धा कायम राहण्याची शक्यता आहे.

आर्यांशने पहिल्यांदा २०२२ च्या अंडर १९ वर्ल्ड कपमध्ये यूएईचं प्रतिनिधित्व केलं होतं. त्यानंतर टी २० वर्ल्ड कप २०२४ च्या क्वालिफायर्समध्ये सुद्धा तो संघाचा भाग होता. २०२३ मध्ये त्याला नेपाळमध्ये होणाऱ्या तिरंगी मालिकेसाठी यूएईच्या वरिष्ठ संघात स्थान मिळाल्यावर एक मोठी संधी मिळाली. या मालिकेद्वारे यूएईने क्रिकेट वर्ल्ड कप पात्रता फेरीत प्रवेश केला. आर्यंशला आशिया कपमध्ये खेळण्याची संधी मिळू शकते. सोबतच तो भारताच्या विरुद्ध सामन्यात खेळताना सुद्धा दिसू शकतो. हा सामना त्याच्या करिअरमधील सर्वात खास ठरेल. आर्यंशचं पदार्पण सामन्यात जबरदस्त शतक : आर्यंशने १७ ऑगस्ट २०२३ मध्ये न्यूझीलंड विरुद्ध टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. पहिल्या सामन्यात त्याने ४३ बॉलमध्ये ६० धावा केल्या. आतापर्यंत त्याने ५ टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ३६५ धावा केल्या आहेत. यात तीन अर्धशतकचा समावेश आहे. तिरंगी मालिकेसाठी यूएईचा संघ : यूएई संघ: मुहम्मद वसीम (कर्णधार), हैदर अली, राहुल चोप्रा, एथन डिसोझा, मुहम्मद फारूख, मुहम्मद जवादुल्ला, हर्षित कौशिक, आसिफ खान, रोहिद खान, सगीर खान, ध्रुव पराशर, अलिशान शराफू, आर्यांश शर्मा, जुनैद सिद्दिकी, मुहम्मद जोहेब.


# सरफराज खानचे सलग दुसरे शतक



रांची : ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारतीय संघाच्या ताफ्यात असलेल्या सरफराज खानला इंग्लंड दौऱ्यात संघाबाहेर करण्यात आले. पुन्हा एकदा दुर्लक्षित झाल्यावर या पठ्ठ्याने जिममध्ये मेहनत घेत फिटनेसवर काम केले. अल्पावधीत १७ किलो वजन घटवत फॅट टू फिट प्रवासाने सर्वांना आश्चर्यचकित केल्यावर आता तो मैदानात फटकेबाजीच्या खास नजरणाऱ्यासह चर्चेत आला आहे.

वेस्ट इंडिजच्या कसोटी मालिके आधी सरफराज खान मुंबई संघाकडून बुची बाबू २०२५ स्पर्धेत आपल्या भात्यातील धमक दाखवून देत आहे. या स्पर्धेतील सलामीच्या दिवशी विरुद्ध शतकी खेळी केल्यावर आता सरफराज खान याने छत्तीसगड विरुद्ध ९९ चेंडूत शतक साजरे केले आहे. आठवड्यात त्याच्या भात्यातून आलेले हे दुसरे शतक ठरले. या कामगिरीसह त्याने पुन्हा एकदा भारतीय संघाचा दरवाजा ठोठावला आहे. इंग्लंड दौऱ्यात भारतीय संघातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आलेल्या सरफराज खान याने बुची बाबू २०२५ स्पर्धेतील सलामीच्या सामन्यात ९२ चेंडूत ९ चौकारासह ३ षटकाराच्या मदतीने शतक ठोकले होते. आपल्या कामगिरीतील सातत्य कायम राखत आता त्याने छत्तीसगड विरुद्धही शतक ठोकले आहे. सरफराज खान याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने कमालीची कामगिरी करुन दाखवल्यावर २०२४ मध्ये त्याला इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्यातून कसोटी पदार्पणाची संधी मिळाली.


आतापर्यंत ६ कसोटी सामन्यातील ११ डावात त्याने टीम इंडियाकडून ३७.१० च्या सरासरीने ३७१ धावा केल्या आहेत. यात एका शतकासह ३ अर्धशतकांचा समावेश आहे. १५० ही त्याची कसोटीतील सर्वोत्तम कामगिरी आहे. इंग्लंड दौऱ्यावरही त्याला संघात स्थान मिळायला हवे होते, पण त्याला पुन्हा डावलण्यात आले. आता तो पुन्हा कमबॅकसाठी कंबर कसताना दिसतो.



## सचिन तेंडुलकर सहकुटुंब लालबागच्या राजा चरणी लीन

मुंबई-दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मुंबईत गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जात आहे. यादरम्यान मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर नुकताच लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मुंबईत पोहोचला होता.आपल्या कुटुंबासह आलेल्या सचिनने पूर्ण भक्तीभावाने गणपतीचे दर्शन घेतले. यादरम्यान त्याची पत्नी अंजली, मुलगी सारा आणि मुलगा अर्जुन देखील त्याच्यासोबत उपस्थित होते. महाराष्ट्रात गणेश चतुर्थीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो आणि लालबाग चा राजा हा मुंबईतील सर्वात जुन्या गणेश मंडळांपैकी एक आहे. जिथे दरवर्षी लाखो गणेशभक्त दर्शनासाठी येतात. लालबागच्या राजाचे दर्शन घेण्यापूर्वी भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या मुंबईतील निवासस्थानी जाऊन गणपतीचे दर्शन घेतले. सचिन तेंडुलकर, त्याची पत्नी अंजली तेंडुलकर आणि मुलगा अर्जुन तेंडुलकरही यावेळी उपस्थित होते.

## भारताचा बांगलादेश दौरा एक वर्ष लांबणीवर




नवी दिल्ली : भारताचा ऑगस्ट २०२५ म्हणजेच पुढच्या महिन्यातील बांगलादेश दौरा एक वर्ष लांबणीवर टाकण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने ५ जुलै म्हणजे आजच ही घोषणा केली आहे. भारतीय क्रिकेट नियामक बोर्ड आणि बांगलादेश क्रिकेट बोर्ड यांनी सहमतीनं हा निर्णय घेतला आहे. भारतीय क्रिकेट टीमचा ऑगस्ट २०२५ बांगलादेशचा दौरा नियोजित होता. बांगलादेशमध्ये भारतीय क्रिकेट संघ तीन वडे आणि तीन टी २० सामना खेळणार होता. भारत आणि बांगलादेशमधील हे सामने १७ ते ३१ ऑगस्टमध्ये होणार होती.बीसीसीआयनं जाहीर केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, दोन्ही क्रिकेट बोर्डांनी चर्चा करुन याबाबत निर्णय घेतला आहे.

दोन्ही संघांची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील व्यस्तता आणि वेळापत्रक या संदर्भातील समस्यांमुळं मालिका लांबणीवर टाकण्यात आली आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डानं स्पष्ट केलं की सप्टेंबर २०२६ मध्ये मालिकेच्या आयोजनास सज्ज असल्याचं म्हटलं. या मालिकेसंदर्भातील तारखांची घोषणा नंतर केली जाणार असल्याचं म्हटलं आहे. बांगलादेश दौरा लांबणीवर गेल्यानं रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या चाहत्यांना धक्का बसला आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना क्रिकेट पाहणं लांबणीवर गेलं आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोघांनी कसोटी क्रिकेट आणि टी २० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्यामुळं वनडे क्रिकेटमध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहली खेळताना दिसतील.

# बेंगळुरू चेंगराचेंगरीनंतर ३ महिन्यांनी आरसीबीने सोडले मौन

हैदराबाद-यंदाच्या आयपीएल हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं १९ वर्षांचा दुष्काळ संपवत ऐतिहासिक विजय मिळवला होता. मात्र, विजयोत्सवानंतर दुसऱ्या दिवशी बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या चेंगराचेंगरीमुळं त्यांचा आनंद काही क्षणातच भंगला होता. या घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला होता, तर, ५६ जण जखमी झाले. आता तब्बल ८४ दिवसांनंतर आरसीबीनं या घटनेवर मौन सोडलं असून'आरसीबी केअर्स' या नव्या उपक्रमाची घोषणा केलीय. या उपक्रमाबाबत सविस्तर माहिती लवकरच जाहीर होणार आहे.

एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर चेंगराचेंगरी

यंदाच्या आयपीएल हंगामात आरसीबीनं प्रथमच खिताब जिंकून इतिहास रचला होता. ४ जून २०२५ रोजी बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर विजयोत्सवासाठी आयोजित कार्यक्रमात स्टेडियमच्या प्रवेशद्वाराजवळ झालेल्या भगदडीमुळं त्यांच्या कार्यक्रमाला गालबोट लागलं होतं. या दुर्घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला आणि ५६ जण जखमी झाले होते. या घटनेनंतर आरसीबीच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यांवर शांतता पसरली होती. तब्बल तीन महिन्यांपर्यंत त्यांनी क्रिकेटबाबत कोणतीही पोस्ट किंवा माहिती शेअर केली नव्हती.



८४ दिवसांनंतर केली भावनिक पोस्ट

८४ दिवसांनंतर, गुरुवारी (२८ ऑगस्ट २०२५) आरसीबीनं आपल्या एक्स हँडलवर एक भावनिक नोट शेअर करत चाहत्यांना संबोधित केलं. या नोटमध्ये त्यांनी लिहिलं, ''प्रिय १२th मॅन आर्मी, हे तुम्हाला आमच्या मनापासून लिहिलेलं पत्र आहे! जवळपास तीन महिन्यांपूर्वी आम्ही येथे शेवटची पोस्ट केली होती. ही शांतता अनुपस्थिती नव्हती, तर ती वेदना होती.'' पुढं नोटमध्ये म्हटलं आहे, ''हा स्पेस नेहमीच उत्साह, आठवणी आणि क्षणांनी भरलेला होता, ज्याचा तुम्ही आनंद घेत होता... पण ४ जूनने सर्व काही बदललं. त्या दिवशी आमचे अंत:करण तुटले आणि तेव्हापासून या स्पेसवर शांतता होती. त्या शांततेत आम्ही शोक व्यक्त करत होतो, ऐकत होतो, शिकत होतो. आणि हळूहळू आम्ही काहीतरी नवीन तयार करण्यास सुरुवात केली, जी केवळ प्रतिक्रिया नाही, तर आमचा पूर्ण विश्वास आहे. यातूनच 'आरसीबी केअर्स'चा जन्म झाला.'', असं त्यांनी पोस्टमध्ये लिहलंय.

आरसीबी केअर्स उपक्रम सुरू

'आरसीबी केअर्स' हा उपक्रम चाहत्यांसोबत एकत्र येण्यासाठी, त्यांचा सन्मान करण्यासाठी आणि जखमांवर फुंकर घालण्यासाठी आहे, असं त्यांनी पोस्टमध्ये नमूद केलं. या उपक्रमांतर्गत पीडित कुटुंबांसाठी आर्थिक मदत, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी किंवा जीवनमान उंचावण्यासाठी काही ठोस पावले उचलली जाऊ शकतात, असे संकेत मिळत आहेत. मात्र, याबाबत स्पष्ट माहिती अद्याप देण्यात आलेली नाही. याबाबत आरसीबीनं लवकरच सविस्तर माहिती जाहीर करण्याचे आश्वासन दिले आहे.

या भगदडीनंतर आरसीबीवर चाहत्यांचा आणि प्रसारमाध्यमांचा दबाव वाढत होता. सोशल मीडियावर फ्रँचायझीच्या शांततेवर टीका होत होती. मात्र, या भावनिक पोस्टने फ्रँचायझीने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ''आम्ही काळजी घेतो आणि नेहमीच घेत राहू,'' असे आरसीबीने आपल्या नोटमध्ये नमूद केलं आहे. या उपक्रमामुळं पीडित कुटुंबांना दिलासा मिळेल आणि फ्रँचायझीशी चाहत्यांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित होईल, अशी शक्यता आहे.

# रजत पाटीदारचे पहिल्याच लढतीत दमदार शतक

मुंबई-देशांतर्गत क्रिकेटमधील महत्वाची स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुलीप ट्रॉफी २०२५ स्पर्धा दमदार सुरूवात झाली आहे. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा देखील संघात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे स्पर्धेचा रोमांच आणखी वाढणार आहे. या स्पर्धेत दमदार कामगिरी करून खेळाडू भारतीय संघात स्थान मिळवण्याच्या प्रयत्नात असणार आहे. दरम्यान आयपीएल स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचं नेतृत्व करणाऱ्या रजत पाटीदारने या स्पर्धेतील क्वार्टर फायनलच्या सामन्यात शतक झळकावलं आहे.

या स्पर्धेसाठी सेंट्रल झोन संघाची जबाबदारी ध्रुव जुरेलकडे सोपवण्यात आली होती. मात्र, तो आजारी असल्याने या सामन्यात खेळू शकलेला नाही. त्याच्याजागी संघाच्या


### आरसीबी चा कर्णधार दुलीप ट्रॉफीत चमकला!

नेतृत्वाची जबाबदारी रजत पाटीदारकडे सोपवण्यात आली आहे. ही जबाबदारी योग्यरित्या पार पाडून त्याने पहिल्याच डावात दमदार शतक झळकावलं आहे.सेंट्रल झोन संघाचा सामना नॉर्थ इस्ट झोन संघाविरूद्ध सुरू आहे. पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या सेंट्रल झोन संघाला सुरूवातीलाच पहिला मोठा धक्का बसला. त्यावेळी संघाची धावसंख्या केवळ ४ होती. त्यानंतर चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी आलेल्या रजत पाटीदारने दमदार फलंदाजी केली आणि शतक पूर्ण केलं. त्याच्या आधी तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या दानिश मालेवारने आधी शतक पूर्ण केलं.

रजत पाटीदारच्या या खेळीचं वैशिष्ट्ये म्हणजे, त्याने कसोटी क्रिकेटमध्येही वनडे स्टाईल आक्रमक फलंदाजी केली. ज्यावेळी तो १११ धावांवर फलंदाजी करत होता. त्यावेळी त्याने अवघे ८५ चेंडू खेळून काढले होते. यादरम्यान त्याने २० चौकार आणि २ षटकार मारले होते.यादरम्यान त्याने १३० च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. कसोटी क्रिकेटमध्ये खूप कमी फलंदाज आहेत, जे या स्ट्राईक रेटने फलंदाजी करतात.रजत पाटीदारला भारतीय संघासाठी ३ कसोटी आणि १ वनडे सामना खेळण्याची संधी मिळाली आहे. मात्र, तो वनडे आणि कसोटी संघातून बाहेर आहे. भारतासाठी खेळताना त्याने ३ कसोटी सामन्यांमध्ये ६३ धावा केल्या आहेत.



# गोल्डन बॉय नीरज चोप्रा डायमंड लीग जिंकण्यासाठी उतरणार मैदानात!




दिल्ली-डायमंड लीग २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना ज्युरिखमध्ये रंगणार आहे. या स्पर्धेत भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रादेखील जेतेपद मिळवण्यासाठी जोर लावताना दिसून येणार आहे. नीरजने डायमंड लीग स्पर्धेतील २ लेग मध्ये सहभाग घेतला आणि एकूण १५ गुणांची कमाई केली. यासह त्याने अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केलं. आतापर्यंत ९०.२३ मीटर ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. तो आणखी लांब थ्रो करून जेतेपद पटकावण्यासाठी पूर्ण जोर लावताना दिसून येऊ शकतो. दरम्यान डायमंड लीग स्पर्धेतील अंतिम सामना केव्हा, कुठे आणि किती वाजता पाहता येईल? जाणून घ्या.

नीरजने याआधी २०२२ मध्ये डायमंड लीगची ट्रॉफी उंचावली होती. पण यावेळी गोल्डन बॉयसाठी ही ट्रॉफी जिंकणं मुळीच सोपं नसणार आहे. त्याला अनेक स्टार खेळाडूंकडून तगडं आव्हान मिळू शकतं. जेतेपदासाठी त्याचा सामना जर्मनीच्या जुलियन वेबर, केन्याचा माजी वर्ल्ड चॅम्पियन जुलियस ऐगो आणि ग्रेनाडाच्या अँडरसन पीटरसोबत होणार आहे. पॅरिस लेगमध्ये नीरजने ८८.१६ मीटर लांब थ्रो करून बाजी मारली होती. तर दोहा लेगमध्ये वेबरने ८७.८८ मीटर लांब थ्रो करून नीरजला पराभूत केले होते. त्यामुळे आता अंतिम फेरीत या दोन्ही दिग्गज खेळाडूंमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळू शकते.

केव्हा आणि कुठे पाहता येणार लाईव्ह?

डायमंड लीग स्पर्धेतील अंतिम सामना आज (२८ ऑगस्ट) रंगणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री ११:१५ वाजता सुरू होणार आहे. या सामन्याचे थेट प्रक्षेपण तुम्ही यूट्यूबवर पाहू शकता. या स्पर्धेतील अंतिम सामन्यात नीरज चोप्रासह ७ खेळाड जेतेपद पटकावण्यासाठी मैदानात उतरणार आहेत. ज्यात अँड्रियन मार्डारे, जुलियस येगो, केशोर्न वॉल्कोट, अँडरसन पीटर्स,जुलियन वेबर आणि सायमन वीलेंड यांचा समावेश आहे.

नीरजने याआधी २०२२ डायमंड लीग स्पर्धेत जेतेपदाचा मान मिळवला होता. त्याने स्पर्धेतील अंतिम सामन्यात त्याने ८८. ४४ मीटर लांब थ्रो करून जेतेपदाला गवसणी घातली होती. यावेळीही नीरज चोप्रा जेतेपदाला गवसणी घालण्याच्या प्रयत्नात असणार आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात वनस्पती रेखाचित्र स्पर्धा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातर्फे दि.२६ ऑगस्ट २०२५ रोजी वनस्पती रेखाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.या स्पर्धेचे उद्घाटक म्हणून वास्तुविशारद प्रज्ञा इनानी व महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी उदघाटन केले.यावेळी विद्यार्थ्यांनी वनस्पतीशास्त्रातील विविध विषयावर रेखाचित्रे तयार करून सादरीकरण केले.प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींचे कौतुक केले व विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन व्यक्तिमत्व विकास करावा असे सांगून सर्व विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहित केले.

सदरील स्पर्धेचे नियोजन स्पर्धा समन्वयक प्रा.निकिता सुडे यांनी उत्कृष्टरित्या केलेले होते.या स्पर्धेत महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील एकूण १७ विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविलेला होता.या वनस्पती रेखाचित्र स्पर्धेमध्ये बी.एस्सी.बी.टी. तृतीय वर्षातील अंबर जानवी या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक मिळविला तर बी.एस्सी.द्वितीय वर्षातील शिंदे आदिती व बी.एस्सी.तृतीय वर्षातील देशमुख सुहानी या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक मिळविला आणि

बी.एस्सी.तृतीय वर्षातील साळुंके भक्ती व एम.एस्सी.प्रथम वर्षातील शिंदे शिल्पा या विद्यार्थीनीने तृतीय क्रमांक मिळविला.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.शितल पाटील व प्रा.तृप्ती सोनकांबळे यांनी काम पाहिले.याप्रसंगी वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.चंद्रशेखर स्वामी,प्रा. शिवाजी आळणे,डॉ.मनीषा गुरमे,प्रा.अश्विनी कांबळे,प्रा. नुजहत शेख,प्रा.विद्या हवालदार,पी.एस.पाटील,एन. डी.भालेराव,आर.व्ही.सलगर,एन.आर.बाहेती यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## 'माविम'च्या माध्यमातून बारामतीच्या महिलांकडून ४० मेट्रिक टन हिरवी मिरची दुबईला निर्यात ग्रामीण महिलांचे कृषी क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर यश

**मुंबई/प्रतिनिधी :** ग्रामीण महिलांना औद्योगिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) 'नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पा'अंतर्गत विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच बारामतीतील ३० महिला शेतकऱ्यांनी उच्च दर्जाची हिरवी मिरची पिकवून तब्बल ४० मेट्रिक टन उत्पादन दुबईला निर्यात केले असून यामुळे इतर महिलांनाही प्रोत्साहन मिळत आहे.

ग्रामीण महिलांनी कृषी क्षेत्रात नेतृत्व करत आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळविले आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या मार्गदर्शनाखाली बारामतीतील ३० महिला शेतकऱ्यांनी उच्च दर्जाची हिरवी मिरची पिकवून तब्बल ४० मेट्रिक टन उत्पादन दुबईला निर्यात केले. हा उपक्रम 'नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पा'अंतर्गत राबविण्यात आला.

या उपक्रमाची अंमलबजावणी संघर्ष क्लस्टर मायक्रो रिसोर्स सेंटर (), बारामती यांच्या माध्यमातून झाली असून कृषी विज्ञान केंद्र, बारामती यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच खरेदी व बाजारपेठेसाठी आदी नेचर फूड्स प्रा. लि. यांच्याशी खरेदी हमी करार करण्यात आला.

शेतीत आधुनिक पद्धतींचा अवलंब

२२ एकर क्षेत्रावर प्रायोगिक तत्वावर सुरू झालेल्या या शेतीत ठिबक सिंचन, मल्चिंग पेपर, सेंद्रिय खतांचा वापर व एकात्मिक कीड व्यवस्थापनासारख्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्यात आला. नेदरलँड तंत्रज्ञानावर आधारित उगमशिव मिरचीची रोपेही वापरण्यात आली.

एकूण उत्पादनात प्रति महिला सरासरी ६,००० किलो मिरची मिळाली. त्यात स्मिता पवार (७,६९२.५ किलो), रोहिणी जाधव (७,६६७.५ किलो) आणि राणी जामधडे (६,०५२.५ किलो) यांचे विशेष योगदान राहिले.

अनियमित पाऊस, काढणी नंतरची गुणवत्ता व निर्यातीतील आव्हाने यावर मात करण्यासाठी सतत फील्ड मार्गदर्शन, पीक विमा सल्ला व प्रक्रिया प्रशिक्षण दिले गेले. पुढील टप्प्यात उत्पादनाच्या गुणवत्तेसाठी स्थळावर ग्रेडिंग युनिट उभारण्याची योजना आहे.

कृषी मूल्यसाखळीत महत्त्वपूर्ण भूमिका

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक उत्पन्न वाढले असून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा अनुभव, तांत्रिक ज्ञान आणि उद्योजकीय कौशल्य विकसित झाले आहे. ग्रामीण महिला जागतिक कृषी मूल्यसाखळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात, हे या प्रयोगातून अधोरेखित झाले आहे. बारामतीचा हा यशस्वी उपक्रम ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी एक 'स्केलेबल व रीप्लिकेबल मॉडेल' ठरत आहे.



# लातूर जिल्ह्यात पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा पालकमंत्र्यांकडून आढावा !

* रस्ते, पुलांवरून पाणी वाहत असल्यास वाहतूक बंद ठेवण्याच्या सूचना
* लातूर शहरातील सखल भागांत आवश्यक उपाययोजना कराव्यात
* नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहण्याचे आवाहन



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात २७ ऑगस्ट रोजीच्या रात्रीपासून जोरदार पाऊस सुरू आहे. यामुळे ६० पैकी २९ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे नद्या, ओढ्यांच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊन पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाने सतर्क राहून तातडीने आवश्यक उपाययोजना हाती घ्याव्यात, कोणतीही जीवितहानी होऊ नये यासाठी संवेदनशीलपणे खबरदारी घ्यावी, असे निर्देश राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले. तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरून न जाता सतर्क राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना आणि लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी यांच्याकडून मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा दूरदृश्य प्रणालीद्वारे तातडीने आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी गेल्या चोवीस तासांत झालेल्या पावसाची माहिती, प्रकल्पांची पाणीपातळी आणि नद्या-ओढ्यांमुळे प्रभावित झालेल्या मार्गांबाबत माहिती दिली.

एकाच दिवसात जोरदार पाऊस झाल्याने जिल्ह्यातील अनेक भागांत पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. तलाव आणि प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे नद्यांमध्ये पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. पावसाचा जोर पुढील काही दिवस असाच कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व शासकीय यंत्रणांनी सतर्क राहावे. महसूल, ग्रामविकास, पाटबंधारे, पोलीस आणि इतर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन परिस्थितीवर लक्ष ठेवावे. आवश्यकतेनुसार उपाययोजना तातडीने हाती घेऊन त्याची समन्वयाने प्रभावी अंमलबजावणी करावी. कोणतीही जीवितहानी होऊ नये यासाठी विशेष खबरदारी घ्यावी. रास्त भाव दुकानांत पुरेसा अन्नधान्य साठा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे तसेच ग्रामीण रुग्णालयांत आवश्यक औषधसाठा उपलब्ध असल्याची खात्री करावी, अशा सूचना पालकमंत्री श्री. भोसले यांनी दिल्या.

रस्ते किंवा पुलांवर पाणी आल्याने वाहतुकीसाठी बंद केलेल्या मार्गांवर ठळक सूचना फलक लावावेत आणि नागरिकांना पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन करावे. आवश्यक ठिकाणी पोलीस प्रशासनाची मदत घ्यावी. प्रकल्पांमधून होणाऱ्या पाण्याच्या विसर्गानुसार नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याच्या पूर्वसूचना द्याव्यात, असे पालकमंत्री श्री. भोसले यांनी सांगितले. लातूर शहरातही मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असून, सखल भागांत पाणी साचण्याची शक्यता आहे. यामुळे महानगरपालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना हाती घ्याव्यात. नियंत्रण कक्षाकडे येणाऱ्या प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेऊन उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी सांगितले.

पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर जिल्हा प्रशासन लक्ष ठेवून आहे आणि सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

## मनपा आयुक्त 'ऑन फिल्ड'

### शहरात पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांची आयुक्तांकडून पाहणी




**लातूर/प्रतिनिधी :** शहर व परिसरात सध्या सुरू असणाऱ्या जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर मनपाचे अधिकारी व कर्मचारी फिल्डवर सक्रिय आहेत. गुरुवारी(दि. २८) आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहरातील पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे करण्याचे आदेश दिले.

आयुक्त श्रीमती मानसी यांनी गुरुवारी अधिकाऱ्यांसह पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांची पाहणी केली. शहरातील इस्लामपुरा, मंत्री नगर, डी - मार्ट परिसरात रिंग रोडवरील मोठा नाला, उस्मानपुरा, अंबाजोगाई रस्त्यावरील पोलीस अधीक्षक कार्यालसमोरील नाला आणि जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वारासमोर जेथे पाणी साठते त्या ठिकाणांची पाहणी केली.या सर्व ठिकाणी पाणी थांबू नये यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. शहरातील सर्व नाले वाहते राहतील याची दक्षता घ्यावी, असेही त्या म्हणाल्या.

याप्रसंगी मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांचीही उपस्थिती होती.

मनपाचा आपत्कालीन विभाग २४ तास कार्यरत आहे. शहरातील नागरिकांना काही अडचण आली तर त्यांनी मनपाच्या ०२३८२-२५५५८५ या टोल फ्री क्रमांकावर किंवा आपत्ती व्यवस्थापन विभागाचे रवी कांबळे यांच्या ९९७०९६४४५३ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. नागरिकांच्या तक्रारींचे त्यामुळे तात्काळ निवारण करणे शक्य होईल, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ६२.८ मिलीमीटर पावसाची नोंद

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात २८ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ६२.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये जळकोट तालुक्यात सर्वाधिक ७७.७ मिलीमीटर, तर उदगीर तालुक्यात सर्वात कमी ५० मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- ६०, औसा- ५७.३, अहमदपूर- ६२.९, निलंगा- ५०, उदगीर- ८६.९, चाकूर- ५१.७, रेणापूर- ६४.९, देवणी- ५९.२, शिरूर अनंतपाळ- ७२.७ आणि जळकोट- ७७.९ मिलीमीटर. पावसाची नोंद झाली आहे. तसेच २९ महसूल मंडळात ६५ मिलीमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.



## निसर्गाला माणसांची नव्हे तर माणसालाच निसर्गाची गरज

### मदन क्षीरसागर (सहाय्यक वनसंरक्षक, परिक्षेत्र नांदेड)



**लातूर/प्रतिनिधी :** ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात विविध उपक्रमांसह गुणवत्तेसाठी प्रयोगशीलता या मूल्यांची जोपासना केली जाते.

विविध सण, उत्सव, सांस्कृतिक, कला,क्रीडा यामध्ये मुलांना उत्स्फूर्तपणे सहभाग होण्याचो संधी व उपक्रमांची जबाबदारी दिली जाते.त्यातील एक सांस्कृतिक उपक्रम म्हणजे श्रीगणेश महोत्सव..

इयत्ता १० वी वर्ग मागील ९ वर्षांपासून सलगतेने श्रीगणेश उत्सव उत्तम नियोजन , व्यवस्थापन आणि कल्पकतेने साजरा करत आला आहे. विविध क्षेत्रातील पाहुण्यांना निमंत्रित करणे,गणपती मूर्ती ठरविणे , सजावट इत्यादी बाबी १० वी गणेश मंडळ ठरवतं. आज उत्सवाच्या पहिल्याच दिवशी गणेशाच्या पूजन व आरतीसाठी मा.श्री.मदन क्षीरसागर ( सहाय्यक वनसंरक्षक ,परिक्षेत्र नांदेड), डॉ. अभय कदम ( अध्यक्ष,आयएमए,लातूर) यांना निमंत्रित करण्यात आले होते .

आजच्या कार्यक्रमाची सुरुवात गणरायाच्या पूजन झाली

त्यानंतरच्या प्रार्थनेने एकूण वातावरण प्रसन्न झाले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना प्रकल्पप्रमुख सतीश नरहरे यांनी पाहुण्यांचे प्रकल्पाच्या वतीने स्वागत केले. तसेच अधिकारी होण्याबरोबरच पाहुण्यांचे वेगळेपण ही आवर्जून सांगितले आणि मुलांचे नियोजनाबाबत कौतुक केले .

डॉ.अभय कदम ( अध्यक्ष,आय एम ए,लातूर) यांनी प्रकल्पाचे कौतुक करताना येथील स्वावलंबन,शिस्त,मातृभाषेतून शिक्षण याबद्दल खूप आनंद व्यक्त केला . तसेच २५ वर्षांपूर्वीच्या शालेय जीवनाची आठवण याप्रसंगी झाली. डॉ.कदम यांनी सातारा सैनिक स्कुल मधील अनेक गोष्टींची तुलना ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पाशी करता येईल असे एकूण वातावरण येथील जाणवते असे मत व्यक्त केले. त्यांनी त्यांच्या बोलण्याचा समारोप करताना म्हणाले,शालेय वयात व्यायाम करणे,संतुलित आहार घेणे,स्वच्छतेची सवयी लागणे करणे याबाबी अधिक महत्त्वाच्या आहेत असा संदेश दिला.

यानंतर मा.श्री.मदन क्षीरसागर ( सहाय्यक वन संरक्षक,परिक्षेत्र नांदेड) यांनी मुलांशी संवाद साधला. प्रकल्पाचे व मुलांचे कौतुक करताना स्वामी विवेकानंदांना अपेक्षित मुलं या प्रकल्पात घडतील असे उदगार काढले.

वनांबद्दल बोलताना ते म्हणाले ,जेथे माणसं,समाज संपतो तेथे निसर्ग सुरू होतो. माणसांची उत्पत्ती खूप नंतरची आहे . मानवाच्या आधी अनेक वर्षांपासून निसर्गाचे अस्तित्व आहे हे माणसाने मान्य करायला हवे . निसर्गाला माणसांची नव्हे तर माणसाला निसर्गाची नितांत गरज आहे.

त्यांनी माणूसला दररोज किती ऑक्सजीन लागतो ते मुलांना अगदी सहज सोप्या भाषेत समजून सांगितले. तसेच आपण कोणकोणत्या बाबीसाठी निसर्गावर अवलंबून आहोत याची उदाहरण दिली .

निसर्गाला जपण्यासाठी सोप्या सोप्या गोष्टी सुचविल्या.माणसांनी गरजा कमी कराव्यात , प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक वापरावी. पाणी,कागद,कोळसा,वीज तारतम्याने वापरावी असा मौलिक सल्ला दिला. शेवटी मुलांच्या प्रश्नांना उत्तरे देताना महाराष्ट्रातील चार कृषी विद्यापीठ, त्यांची कामे, स्वतःचा जीवन प्रवास, वनखात्यातील पदांचा क्रम याविषयीही माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इयत्ता १० वी तील यश माळवदकर व आलिया शेख यांनी केले.यावेळी सर्व शिक्षक व इयत्ता ५ वी ते १० वी तील विद्यार्थी उपस्थित होते.मुलांच्या व्यवस्थापणात होणाऱ्या या उत्सवात शिक्षक वसंत पाटील,शुभदा पाठक यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत .

### जाहीरनामा
### लातूर येथील ८वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, लातूर यांच्या न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत

दिवाणी अ. १५० म.

वारसा प्रमाणपत्र अर्ज क्र.१५४०/२०२५
(शोभा व इतर वि. निरंक)
निशाणी क्रमांक. ०६

ज्यापेक्षा मयत **मारुती दिगंबर पाटील** हे **दि.०२/०८/२०२५** रोजी मौजे **मंदाडे हॉस्पीटल, लातूर** येथे मयत झाले असून, अर्जदार **क्र.१** नामे **शोभा भ्र. मारुती पाटील, वय- ५३ वर्षे, धंदा- गृहिणी**, अर्जदार **क्र. २** नामे **शिवाजी पि. मारुती पाटिल, वय- ३१ वर्षे, धंदा-शिक्षण**, अर्जदार **क्र.३** नामे **श्रध्दा पि. मारुती पाटील, वय- २७ वर्षे, धंदा- शिक्षण,** अर्जदार **क्र.४** नामे **सुषमा पि. मारुती पाटील, वय- २५ वर्षे, धंदा- शिक्षण,**

वरील सर्व **रा.गूरुकृपा निवास, केशवराज स्कूल रोड, काळगे हॉस्पीटल समोर, नेताजी नगर, लातूर ता. व जि. लातूर**. अर्जदार **क्र.५** नामे **पूनम भ्र. शार्दूल साळुंके, वय- २९ वर्षे, धंदा - गृहिणी, रा. मु. पोस्ट पानचिंचोली ता. निलंगा जि.लातूर** यांनी मयताच्या पश्यात मयताचे कायदेशीर वारस या नात्याने शासकीय निमशासकीय कामासाठी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार हे सदरहु मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिध्द झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे वारसाबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा वारस शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत **मारुती दिगंबर पाटील**, यांचे वरील अर्जदार यांना कायदेशिर वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

तारीख २५ माहे ०८ सन २०२५.
**पु.ने. तारीख- २९/०९/२०२५.**

आदेशावरून,

कोर्ट शिक्का

स्वाक्षरित/-
(आर.एन.स्वामी)
क. लिपीक
८वे सह दि.न्या.व. स्तर, लातूर

स्वाक्षरित/-
सहा. अधिक्षक, दिवाणी
न्यायालया व. स्तर, लातूर

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.
शाखा १. जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २. जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# वडार महामंडळाची झाली दैना, सरकार लक्ष देईना..

## अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मंडळाच्या धर्तीवर वडार महामंडळाला योजना लागू करण्याची वडार समाज संघाची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** वडार आर्थिक विकास महामंडळाच्या मार्फत वडार जमातीच्या उन्नतीचा मार्ग खुला व्हावा, या जमातीमध्ये अनेक उद्योजक तयार व्हावेत, या जमातीतील तरुणांना उद्योग-व्यवसायाकडे वळवता यावे तसेच वडार समाजाला आजपर्यंत शासन पातळीवर कसलाच लाभ झाला नाही या विचाराने महत्प्रयासानंतर तत्कालीन आणि विद्यमान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी महामंडळ स्थापन केले. महामंडळ स्थापन होऊनही मागील अनेक वर्षांपासून या महामंडळ अंतर्गत एकही फाईल मंजूर करण्यात आले नाही, आणि ज्या घोषणा झाल्या त्या अद्यापही पूर्ण झाले नाही म्हणून महामंडळाची झाली दैना आणि वडार जमातीला काही मिळेना असे निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

श्रीकांत मुद्दे म्हणाले की, मा.देवेंद्र फडणवीस यांनी २०१८ साली वडार महामेळाव्यातून मोठ्या हर्षोल्लासात घोषणा केली. मात्र शासन पातळीवरती मोठ्या कष्टाने सरकारला जीआर काढण्यासाठी २०२३ साल उजाडले तरी अद्यापही या महामंडळाला ना निधी मिळाला, ना फाईल मंजूर झाली, ना या वडार जमातीला या महामंडळाचा कसलाच लाभ झाला नाही हेच वास्तव आहे. नुकताच ७९ व स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तरुणांचा देश समजल्या जाणाऱ्या या देशातला विमुक्त-भटक्या समूहातील आणि वडार जमातीतला तरुण हाताला काम नसल्यामुळे देशोधडीला लागलाय. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, अनैतिकता, दुराचार, जात-धर्म-पंथ, सत्ता लोलुपता अशा आघाड्यांवर लढावं लागतय. या जमातीकडे राजकारण्यांनी सदैव नकारात्मकता बाळगल्यानं ही विपन्नावस्था आली. कसे जगावे हा त्यांच्यापुढे फार मोठा प्रश्नचिन्ह बनला आहे. वडार जमातीला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणायचा असेल तर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर सर्वच योजना वडार आर्थिक विकास महामंडळाला लागू करण्यात यावे. तसेच नुकताच महाराष्ट्र शासनाच्या वतीने ३१ ऑगस्ट हा 'विमुक्त दिन' म्हणून शासकीय पातळीवर मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात यावे याला मंजुरी मिळाली. मात्र ज्या समूहांसाठी हा दिन साजरा करण्यात येतो आहे, त्यांच्यापर्यंत जर शासकीय योजना पोहोचतच नसतील तर याला काय अर्थ आहे. किमान या समूहासाठी शासन पातळीवरती ज्या योजना जाहीर केलेले आहेत त्याची अंमलबजावणी ही प्रभावीपणे केली तरच या योजनांना अर्थ आहे. अन्यथा ३१ ऑगस्ट कागदोपत्री साजरा करून काहीच हेतू साध्य होणार नाही. हेही तितकेच सत्य म्हणावे लागेल.



वडार जमातीला महामंडळ स्थापन झाल्याबरोबर ५० कोटी जाहीर झाले होते. त्याचे पुढे काय झाले? या जमातीतील किती लाभार्थ्यांना याचा लाभ झाला हा प्रश्नचिन्हच आहे. त्यानंतर २०२३ साली परत एकदा महामंडळ अंतर्गत ५० कोटींची घोषणा करण्यात आली, मात्र किती या जमातीतील लाभार्थ्यांना लाभ झाला हा ही एक चिंतनशीलच प्रश्न बनला आहे. केवळ शासकीय पातळीवर घोषणा करायच्या मात्र अंमलबजावणी मात्र करायचीच नाही असे एकंदरीत ठरले आहे का? कारण आज पर्यंत या जमातीला केवळ घोषणांच्या व्यतिरिक्त काही मिळताना दिसत नाही. सरकार घोषणा करते, सततची अधिकाऱ्यांची टाळाटाळ, मुख्यमंत्री साहेबांची उदासीनता आणि राज्यकर्त्यांची उदासीनता तसेच या राज्यामध्ये सामाजिक न्याय विभाग आहे की नाही हाही फार मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. असे अनेक प्रश्न आजही वडार जमाती बाबत अनुत्तरीतच आहेत. अशा समूहातील घटकांसाठी केवळ घोषणा करून चालणार नाही तर या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज आहे. तरच या समूहाच्या प्रगतीच्या वाटचालीस सुरूवात होईल. अन्यथा येणारे प्रत्येक सरकार केवळ आश्वासनं देऊन बोळवण करण्यात वेळ घालवेल यामुळे काही साध्य होणार नाही. तसेच या जमातीला राजकीय आरक्षणाची ही नितांत आवश्यकता आहे. स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महानगरपालिका या ठिकाणी निवडणूक लढण्याइतपत आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने वर्षानुवर्ष हा घटक साध्या साध्या निवडणुकांमध्ये सुद्धा दिसून येत नाही त्यामुळे यांना येणाऱ्या काळात महानगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण लागू करण्यात यावे, असेही सामाजिक कार्यकर्ते भटक्या- विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

### प्रमुख मागण्या

१. महामंडळ अंतर्गत १५ लाख बिनव्याजी कर्ज मिळावे.

२. शैक्षणिक कर्ज मिळावे.

३. स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका आणि इतर ठिकाणी प्रतिनिधित्व म्हणून या जमातीसाठी आरक्षणाची तरतूद करावी.

४. विमुक्त-भटक्या जमातींसाठी अर्थसंकल्पामध्ये स्वतंत्र बजेटची तरतूद करण्यात यावी.

५. विमुक्त-भटक्या समूहांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण आणि संशोधन संस्था चालू करावी.

### लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ९१.८ मिलीमीटर पावसाची नोंद

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात २९ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ९१.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये चाकूर तालुक्यात सर्वाधिक १५२.४ मिलीमीटर, तर औसा तालुक्यात सर्वात कमी ३२ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- ८१.२, औसा- ३२, अहमदपूर- १४५.२, निलंगा- ४५.२, उदगीर- १२३.६, चाकूर- १५२.४, रेणापूर- १०६.४, देवणी- ७५.८, शिरूर अनंतपाळ- १०२.५ आणि जळकोट- ११२.६ मिलीमीटर. पावसाची नोंद झाली आहे.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचा अरविंद तपसे 'अ' विभागीय बेस्ट फिजिक स्पर्धेत प्रथम




**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व आझाद महाविद्यालय औसा, जि. लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या 'अ' विभागीय बेस्ट फिजिक स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूरच्या बी. फार्मसी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या स्पर्धेत ९५ किलो वजनी गटात अरविंद तपसे याने प्रथम, नावेद शेख याने द्वितीय क्रमांक पटकावला. स्वप्नील फुले याने ९० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. क्रीडाप्राध्यापक ऋषिकेश मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यार्थ्यांनी ही सन्माननीय कामगिरी साधली आहे. स्पर्धेतील या उल्लेखनीय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. अरविंदजी सोनवणे, ललितभाई शहा, रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच संस्थेचे सर्व पदाधिकाऱ्यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थ्यांनी स्पर्धकांचे विशेष कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले आहे.

## घरणी नदीला महापूर, शेतकऱ्यांचे जन जीवन विस्कळीत; हजारो हेक्टर जमीन पाण्याखाली



**नळेगाव/अजगर मजकुरी :** नळेगाव येथील घरी नदीला शेतकऱ्याचे जनजीवन विस्कळीत झालेले आहे आजूबाजूच्या शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचा इशारा दिलेला आहेमहापौर संगप्पा महाराजांच्या पुलावरून काटोकाठ पाणी जात असल्याने हजारो हेक्टर जमीन पाण्याखाली गेलेली आहे

## लातूर जिल्ह्यास मुसळधार पावसाने पुन्हा झोडपले; पाच तालुक्यांत अतिवृष्टी, अनेक रस्ते पाण्याखाली

**लातूर/प्रतिनिधी :** शहरासह जिल्ह्यात बुधवारी सायंकाळपासून जोरदार पाऊस होत आहे. जिल्ह्यातील उदगीर, रेणापूर, शिरुर अनंतपाळ आणि जळकोट तालुक्यात अतिवृष्टी झाली आहे. तसेच उदगीर तालुक्यातील धडकनाळ, बोरगावला पुराच्या पाण्याने वेढले आहे. गुरुवारी सकाळी ८ वाजेपर्यंत २४ तासांत जिल्ह्यात सरासरी ६२.८ मिमी पाऊस झाला आहे.विघ्नहर्ता गणरायाबरोबर पावसाचे पुनरागमन झाले आहे. बुधवारी रात्री मुसळधार पावसाने जिल्ह्यास अक्षरश: झोडपून काढले. त्यामुळे जिकडे- तिकडे पाणीच पाणी झाले आहे. जिल्ह्यातील नद्या दुथडी भरुन वाहत असून अनेक ठिकाणच्या पुलावरुन पाणी वाहत असल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. कर्नाटकातील इंचूर नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने लातूर- जहिराबाद महामार्ग बंद झाला आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक सोलापूर- हैदराबाद मार्गे वळविण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यातील माणकेश्वर- उदगीर मार्गावरील इंद्राळ येथील पुलावरून पाणी वाहत आहे.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


### महोत्सव ...

मोरया मोरया गजरी
श्रीबाप्पा विराजमान
आवाहन गणरायाचे
आनंदा आले उधाण

मिरवणूकी उत्साहात
मात्राखे समाजभान
शास्त्रोक्तमंत्रोच्चारात
उजळे भक्तीचेलुभान

डि जे संयमी वाजला
राखे डेसिबलसन्मान
शाबीत राहतात कान
उंचावे सुखानंदे मान

पर्यावरण पूरक मूर्त्यां
होई निसर्गा अभिमान
आरासही देखणे छान
विषय सार्थ उर्जावान

रक्त दान अवयव दान
कुठेभुकेल्या अन्नदान
अभिनव उपक्रम रंगे
कार्यक्रम जोडे संधान

व्याख्यानमालारंगल्या
कलाकारास्तव खदान
गणराज कलांचे दैवत
कित्येकां सुसंधीप्रदान

सर्व धर्मिय सम्मिलित
उत्सवाचे हेचं वरदान
गणेशावाटो परत येवू
तेंव्हांचखरे भाग्यवान

निरोप देता गजानना
राहू अधिक सावधान
अनुचित न घडो मुळी
आधी सतर्क प्रावधान

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## देवणी तालुका ओला दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करुन प्रती एकरी ५० हजार तात्काळ मदत करा

### भाजयुमो तालुकाध्यक्ष रामलिंग शेरे यांची मागणी
### मंडळअधिकारी बि.के केंद्रे यांना दिले भाजयुमो ने निवेदन

**देवणी/प्रतिनिधी :** देवणी तालुक्यात सततच्या तिन ते चार दिवसाच्या पाऊसामुळे व अतिवृष्टीमूळे मांजरा व देव नदीच्या पुरामुळे शेतकर्याचे खरीप हंगामातील तुर मुग, सोयाबिन, तिळ या पिकाचे आतोनात नुकसान झाले आहे व या सततच्या पाऊसामूळे व पूरामुळे देवणी तालुक्यातील लाखो हेक्टरचे खरीप हंगामातील पिके ,हे पाण्याखाली आहेत त्यामूळे मूग व उडीद हे काढणीला व हाती आलेला बळीराजाचा घास आता पाण्याखाली आहे. या सततच्या अतिवृष्टी व पुरामूळे पिके सोयाबिन करपुन पाण्यामध्ये असल्यामूळे आता दूर्गधी पसरत आहे,

बळीराजा हा सतत आस्मानी व उस्मानी संकटाच्या गर्देत अडकलेला असतो ,या अस्मानी संकटामुळे बळीराजा वरती उपासमारीची वेळ आली आहे व तोडी आलेला घास यामूळे हिरावला गेला आहे यामुळे शेतकरी बांधवाच आतोनात नुकसान झाल आहे,तरी सरकारने देवणी तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकर्याना सरसकट प्रती एकरी ५० हजार रु आर्थिक मदत जाहीर करावी असे निवेदन थेट मांजरा नदीच्या पुलावरती देवणी तहसिलचे मंडळ अधिकारी श्री बी के केंद्रे यांना भाजयुमोचे तालुकाध्यक्ष श्री रामलिंग शेरे यांनी दिले

यावेळी धनेगांव येथील शेतकरी श्री बालाजी बिरादार, सिध्देश्वर पाटील,रवि खारे,किशोर बिरादार,बबलु बिरादार,अनिल पोतदार, विष्णू दंतराव,बंडु जाधव ,शिवाजी हलगरे,माधव खारे नरसिंग बिरादार , आदीसह शेतकरी उपस्थीत होते

## दयानंद वाणिज्य बीसीए विभागातर्फे मुलाखत कौशल्य विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम संपन्न




**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या बीसीए विभागाच्या वतीने २८ ऑगस्ट २०२५ रोजी मुलाखत कौशल्य या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच बीसीए विभाग प्रमुख प्रा.शशिकांत स्वामी याची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी निवृत्ती भंडे आणि सोनल बरुरे हे विद्यार्थी विप्रो इंटिग्रेटेड लर्निंग प्रोग्राम ही परीक्षा उत्तीर्ण झालेले असून. ती आत्ता विप्रो कंपनीमध्ये स्कॉलर ट्रेनिंग या पोझिशन वरती कार्यरत आहेत. निवृत्ती भंडे आणि कु. सोनल बरुरे यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना इंटरव्यूची तयारी कशी करायची तसेच त्या बाबतीत येणाऱ्या अडचणी व ट्रेनिंग मध्ये येणाऱ्या अडचणी याबाबतीत सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप मध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लहाने यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालया मार्फत विविध उपक्रम राबवली जातात याबद्दल मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी बीसीए विभागातील प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम)मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा सूचना क्रमांक: 23-2025-SrDENS, कामाचे नाव: फेब्रुवारी २०२३ च्या RDSO/LKO च्या नवीनतम तपशीलानुसार रेल्वे ग्राउंडवर ६५ मिमी मशीन क्रश स्टोन बॅलास्टचा पुरवठा आणि स्टॅकिंग, ज्यामध्ये रॉयल्टी आणि शुल्क इत्यादी नवीनतम सुधारणा समाविष्ट आहेत आणि ते HQR डेपो येथील साइटवर ADEN ने निर्देशित केल्यानुसार रेल्वे हॉपर/वॅगन इत्यादींमध्ये लोड करणे (एकूण 50,000 m3). कामाची अंदाजे किंमत: ४,०५,८०,५००.००, बयाणा रक्कम: ३,५२,९००.००, काम पूर्ण करण्याचा कालावधी: १८ महिने, देखभाल कालावधी: NA. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: १५/०९/२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत, www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची वेळ: १५/०९/२०२५ रोजी १५.३० वाजेपर्यंत. निविदाधारकांना निविदा अंतिम तारखेपर्यंत वेळोवेळी कोणतेही बदल किंवा शुद्धीपत्रक (जर असेल तर) पाहण्यासाठी www.ireps.gov.in वेबसाइटला भेट देण्याची विनंती केली जाते.

**डीआरएम (वर्क्स), सोलापूर**

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है SLP-53



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६